करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.अॅड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

वर्ष 31 वे

साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com |

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१०५ | पाने-२४ | दि.९/१२/२०२२ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.








# जगताप गट तालुका राजकारणात आ.संजयमामा सोबत तर वरीष्ठ पातळीवर भाजपासोबतच काम करणार : माजी आमदार जयवंतराव जगताप

करमाळा : करमाळा तालुक्यामध्ये जगताप गटाने स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर आजपर्यंत खूप चांगल्या क्षमतेने काम केले आहे. माजी आमदार स्वातंत्र्यसैनिक कै.नामदेवरावजी जगताप यांनी या तालुक्याच्या विकासासाठी संपूर्ण हयात वेचली. त्यांच्यानंतर जनतेच्या पाठींब्याने मी आजपर्यंत तालुक्याच्या विकासासाठी काम करत आहे. राजकारणाचा विचार करता तालुका राजकारणात जगताप गट हा आमदार संजयमामा शिंदे यांच्या सोबत कायम राहणार आहे. परंतू वरीष्ठ पातळीवर जगताप गट हा भाजपा पक्षाचेच काम करणार आहे; असे जगताप गटाचे नेते व माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी सांगितले.

माजी आमदार जगताप यांच्या वाढदिवसा निमित्ताने ते सा.कमलाभवानी संदेशशी बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, की आम्ही स्वातंत्र्यसैनिकाचे वारसदार असून आम्हाला कशाचीही अपेक्षा नाही. राजकारणात आजपर्यंत आपण भ्रष्टाचार मुक्त कारभार केला असून, मी कधीही खोटे बोलत नाही व स्पष्ट वक्ता म्हणून वाटचाल करतो. माझ्या वाटचालीत मी कोणाही विरोधकाचे नुकसान केले नाही. त्यामुळे इतरांचे नुकसान करण्याचा प्रश्नच नाही. तालुक्यात विकास-कामासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. आजही आ.संजयमामा यांचे सोबत तालुक्यातील वेगवेगळे प्रश्न सोडवत आहे. विकास हा कधीच परिपूर्ण होत नाही. त्यामुळे काही ना काही समस्या राहतात. तरीही आहे या समस्या सोडविण्यासाठी (पान नं.२ वर)



करमाळा तालुक्यातील आदिनाथ सहकारी साखर कारखाना, जिल्हापरिषद, पंचायत समिती, नगरपालिका अशा सर्व निवडणुका आ.संजयमामा व जगताप गट एकत्र लढवणार आहोत. तालुक्यातील जनतेला शांतता, सुव्यवस्था व आरोग्य देण्याबाबत प्रयत्न करत आहेत. याबरोबरच औद्योगिकीकरण, शेतीचे प्रश्न हे सोडविण्यासाठी नियोजनबध्द काम करत आहोत. तालुक्यातील जनतेने विकासकाम करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी उभे रहावे. सध्या राजकारणात पैसा महत्वाचा ठरत असून, मतदार पैशाच्या पाठीमागे जात असल्याने चुकीचे लोक सत्तेत येत आहेत. त्यामुळे मी माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने तालुक्यातील जनतेला विनंती करतो, की निवडणुकीत मतदानाला सर्व मतदारांनी झाडून यावे. कोणत्याही अपेक्षेला बळी न पडता योग्य निवड करून मतदान करावे. की ज्यामुळे भविष्यात चांगला उमेदवार निवडून येईल व जनतेची सेवा करेन.

...जयवंतराव जगताप(माजी आमदार)



राजकारण हा विकासाचा केंद्रबिंदू असतो त्यामुळे राजकारणात योग्य व्यक्तीकडे सत्ता गेली पाहिजे...!

संपादकीय......................................!

# गावचे कारभारी !

तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणूका सुरू आहेत. काही जागा बिनविरोध निघाल्या तरी अनेक गावातून चुरस आहे. राजकारण म्हटलं की सत्तेसाठी धावपळ असते. राजकारणाशिवाय सत्ता नाही आणि सत्तेशिवाय राजकारणाला मजा नाही. गेल्या अनेक वर्षापासून राजकारणावर उलट-सुलट चर्चा सुरू असतात. अनेकजण म्हणतात.. राजकारण हे सर्वसामान्यांचे काम नाही. तर कोणी म्हणतो, राजकारण हा पैशाचा खेळ आहे. कोण म्हणतो, राजकारण म्हणजे ज्याला चार गुंड सांभाळता येतात त्यांनी राजकारण करावे, इतरांचे काम नाही. राजकारण म्हणजे विशिष्ट लोकांची मक्तेदारी आहे. ज्यांची मक्तेदारी आहे अशांनीच राजकारण करावे व इतरांनी ते फक्त पहावे; असा बहुतेकांचा गैरसमज आहे. खरंतर राजकारण हा असा विषय आहे की, तो धरता येत नाही आणि सोडता येत नाही आणि बाजुला टाकायचे म्हटलेतर बाजूला टाकता येत नाही. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या प्रत्येकजण राजकारणाशी जोडलेला असतोच. प्रत्येकाची राजकारणावर काही मते ठरलेली असतात. राजकारणात दोन गट असतात, जे प्रत्यक्षात निवडणुकीला उभे असतात ते आणि जे मत देतात ते असे दोन भाग पडतात.

वास्तविक पाहता राजकारण म्हणजे वेगळे काही नाही. लोकशाहीने समाजासाठी अधिकृत काम करण्याची दिलेली संधी आहे. माणूस हा समाजप्रिय असतो. प्रत्येकजण एकमेकासाठी काही ना काही करत असतो. काही लोक छोटे काम करतात तर काही लोक मोठे काम करतात. जे मोठ्या प्रमाणात काम करतात त्यांची दखल घेतली जाते. ते सत्ताकारणाकडे झुकतात आणि तेथून राजकारण सुरू होते. थोडक्यात राजकारण म्हणजे सत्ता हस्तगत करण्यासाठी राजकारणात ज्या खटपटी केल्या जातात त्याला राजकारण म्हटले जाते. आपला देश स्वतंत्र नव्हता तेंव्हा देश स्वतंत्र होण्यासाठी जी चळवळ राबवली त्या चळवळीपासून ते स्वातंत्र्यनंतर सत्ता काबीज करण्यासाठी ज्या ज्या घडामोडी केल्या, त्याची नोंद राजकारणात झालेली आहे. फरक एवढाच की स्वातंत्र्यानंतर राजकारणात सत्ता ही केंद्रस्थानी आली. सत्तेतून व्यक्तीमत्वाचा विकास, आर्थीक उन्नत्ती,आपले हितचिंतक व परिसराचे भवितव्य बदलता येते; हे लक्षात आल्यावर सत्ता मिळवण्यासाठी अनेक मार्ग आखले जावू लागले. त्यामध्ये काही धाडसी तर काही कुटील मार्ग निघाले. दुर्दैवाने कुटील कारस्थानाला सुध्दा राजकारण हाच शब्द जोडला, त्यामुळे राजकारण शब्दाला मलीनता आली आहे.

राजकारणात स्थिरावण्यासाठी व सत्ता हस्तगत करण्यासाठी अनेकजण अनेक पर्याय वापरतात. पुर्वी गांधीजी जेंव्हा हा देश स्वतंत्र व्हावा म्हणून झगडत होते, तेंव्हा ते नेते असूनही त्यांनी सर्वसामान्यांची दुरावस्था पाहून अंगावर फक्त पंचा घेतला. दिन, दुःखीतांच्या दारात ते स्वतः गेले. त्यांना कधीही माझ्यावर विश्वास ठेवा; असे म्हणावे लागले नाही. स्वतःच्या जगण्यातून त्यांनी सर्वसामान्यांचा विश्वास कमवला व टिकवला. अर्थातच यासाठी किंमत चुकवावी लागते. अलीकडे राजकारणाला ओंगळवाणे स्वरूप आले आहे. राजकारण करायचे म्हटलेतर पदरी काही गुंड पाळावे लागतात, स्वतःच्या नावाची दहशत बसवावी लागते, दोन नंबरचे धंदे असावे लागतात. त्यातून कार्यकर्तेपोसले जातात. तेच निवडणुकीवेळी समाजसेवक म्हणून मिरवतात. निवडणुकीच्या काळात मतदारांना सर्व पुरवायचे, पैसा, दारू, ते पाहिजे ती वस्तू देण्याची परंपरा सुरू झाली आहे. मत मिळवताना सर्वसामान्यांचे पाय धरायचे व सत्ता येतातच मतदारांचे पाय ओढायचे हे सुत्र जवळपास सर्वत्र रूढ झाले आहे. निवडणुकीत पैसा पेरायचा आणि सत्ता मिळताच त्याच्या दुप्पट उगवायचा. अनेकांनी राजकारण हा पैसे कमवायचा धंदाच बनवला आहे.

राज्यातील व देशातील सत्ताधारी तसेच विरोधी पक्षाच्या उमेदवारांचे उमेवारी अर्जा सोबत उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र पाहिलेतर लक्षात येते,की गेल्या पाच वर्षापुर्वी नेत्याच्या उत्पन्नापेक्षा पुढच्या पाच वर्षात दुप्पट-चौपट वाढ झाली आहे. कोणाची नावे घेण्याची गरज नाही. निवडणुकीला उभे असणाऱ्या प्रतिनिधींचे राजकारणात दोन गट असतात. जे प्रत्यक्षात निवडणूकीला उभे असतात ते आणि जे मत देतात ते असे दोन भाग पडतात. हे पाहिले की सर्व काही स्पष्ट होते. अनेकांना राजकारण म्हणजे परीसस्पर्श वाटत आहे. राजकारणात आले,की प्रचंड संपत्ती जोडता येते. सहज एक उदाहरण पहायाला हरकत नाही. उत्तरप्रदेशातुन एक फाटक्या कपड्याचा तरूण मुंबईत आला. पोट भरण्यासाठी काम करत असताना, त्याला मुंबई काँग्रेसचे कार्यालय झाडायची नोकरी मिळाली. तिथे काम करत करत तो मोठा झाला आणि तोच थेट मुंबई काँग्रेसचा अध्यक्ष झाला. त्याच्यावर धाड पडली तेंव्हा त्याच्याकडे ३५० कोटी रूपयाचे घबाड सापडले. अवघ्या २० ते २५ वर्षातील हा बदल नेमके काय सांगतो.

एका बाजुला लालूच दाखवून दुसऱ्या बाजुला लालुच देवून सत्ता हस्तगत करण्याचा प्रकार तर तिसऱ्या बाजुला स्वतः पोटभर खायचे दुःखीतांसमोर अश्रू ढाळायचे. पोपटापेक्षा जास्त पोपटपंची दाखवयाची, गोड गोड बोलून व खोटी आश्वासने देवून सत्ता काबीज करायची आणि त्यानंतर मतदाराकडे न फिरकणे असेही प्रकार होतात. काही बोलघेवडे लोक केवळ बोलण्याची लकब, सर्वसामान्यात मिसळणे आणि त्यांच्या परिवारातील कार्यक्रमाला हजेरी लावून सत्ता काबीज करतात. काही ठिकाणी भावनीक प्रश्न करून सत्ता हस्तगत करतात. काही ठिकाणी स्वतःचा विकास करायचा व त्याच जोरावर सत्ता मिळवायची आणि पुन्हा स्वतःचाच विकास करायचा असे काहीजणांनी सुत्रच ठरवले आहे. काहीजण तर वारसहक्काने सत्ता काबीज करून संपत्ती लुटत असतात. काहीजण सर्वसामान्यांची दुर्बलता लक्षात घेऊन त्यांना आपल्याकडील संस्थाचा आधार देवून कायमचे गुलाम बनवतात व वर्षानुवर्षेत्यांच्या मतावर आपली सत्तेची पोळी भाजतात. सत्ता मिळवण्याचे असे एक ना अनेक मार्ग आखून राजकारणात यशस्वी होणारे महाभाग सर्वत्र आहेत.

राजकारणात सत्ता मिळवणे सोपे असते पण ते टिकवणे सोपे नसते. लबाडी झबाडी करून मिळवलेली सत्ता चिरकाल नसते. मतदारापर्यंत तुमचे कार्य व तुमची तळमळ गेली असेलतरच मतदार कायम पाठीशी उभा राहतो. जिल्ह्यातील एकमेव नेता गणपतराव देशमुख असे आहेत की, कोणत्याही कुरघोड्यापेक्षा केवळ कर्तृत्व आणि मतदारावर असलेले प्रेम यातून त्यांना जनतेने ८० व्या वर्षीही सत्तास्थानावर बसवलेले आहे. राज्यातील एकमेव नेता स्वर्कृत्वावाने जनतेच्या हृदयावर अधिराज्य करत आहे. आपल्या तालुक्यात सत्तेत अनेकजण आले व गेले असेच चित्र राज्यात बहुतेक ठिकाणी पहावयास मिळते. अर्थातच त्याला अपवाद आहेत. आपल्या तालुक्याचे एक चांगले आहे, की येथे राजकारणातील दादागीरीला कोणतेही स्थान येथील मतदार देत नाही. अजुनही पैशावर भुलून मतात फारसा फरक झालेला दिसून येत नाही. राज्यात सत्ताकारणासाठी ज्या लबाड्या केल्या जातात, तशा लबाड्या करमाळा तालुक्यात फारशा प्रमाणात होत नाही; ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे.

अलीकडे तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी कोणाचा बांधील राहिलेला नाही. तालुक्यातील अनेक गावा-गावातील युवक सुशिक्षीत असून तालुक्यातील हजारो तरूण उच्च शिक्षीत झाले आहेत, एवढेच नव्हेतर शेकडो तरूण राज्यातील सन्मानाच्या पदावर सेवेत कार्यरत आहेत. त्यांच्या शब्दावर गावा-गावातील नागरिकांचा विश्वास आहे. त्यांनी ठरवलेतर ते आख्खे गावाचे व तालुक्याचे राजकरण सहज बदलू शकतात, अशी ताकदवान युवकांची फळी निर्माण झाली आहे. असे असलेतरी या राजकारणात अजुनही या तालुक्यातील युवक पाहिजे तसा पुढे येत नाही; ही दुर्दैवाची गोष्ट आहे. तालुक्याचा विकास झाला पाहिजे, राजकारण बदलले पाहिजे, भ्रष्ट राजकारणात सुधारणा झाल्या पाहिजे हे तरूणांना मान्य आहे पण हे बदलण्यासाठी राजकारणात स्वतः उतरण्याची तयारी तरूणात नाही ही वस्तुस्थिती आहे. खरंतर हे तालुक्याचे चित्र बदलण्यासाठी व राजकीय पायवाट बदलण्यासाठी गावा-गावातील तरूणांनी सत्ताकारणात पुढे आले पाहिजे. एक-एक ग्रामपंचायत बदलली, आजही सत्तेवर अनेक तरूण दिसतात पण ते तरूण फक्त वयाने तरूण आहेत व विशिष्ट राजकीय दावणीला बांधलेले आहेत. बहुतांशी कुवत नसणाऱ्या व शब्द न ओलंडणाऱ्यांना निवडणुकीत संधी मिळते. जनमाणसात काही करण्याची धमक आहे व तालुका बदलण्याचे स्वप्न हृदयी ज्यांनी बांधले आहे, त्यांनी मोठ्या सत्ताकारणापेक्षा गावपातळीपासून विकासाचे स्वप्न पाहून राजकारणात आले पाहिजे व खरे राजकारण कशाला म्हणतात, ते दाखवून दिले पाहिजे. जनमतातील सरपंच ही संकल्पना प्रत्यक्षात अवतरली आहे. सध्याच्या ३० ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत मांजरगाव, शेलगाव(वांगी), वरकटणे, वाशिंबे, सोगाव, पोंधवडी, कुंभारगाव, विहाळ, मोरवड, भिलारवाडी, दहिगाव, पोफळज, खातगाव, पोमलवाडी, कात्रज, जिंती, कामोणे, तरटगाव, खडकी, देलवडी, कोंढारचिंचोली अशी महत्वाची गावे आहेत. या गावातील निवडणुकीत पुर्वीचे राजकारण बदलून नव्या संकल्पना रूजवण्याची गरज आहे. आपल्या विकासाच्या दृष्टीने या निवडणुकीच्या या माध्यमातून बदल करून दाखववा !

पान १ वरून पुढे

## तालुका राजकारणात आ.शिंदे सोबत तर वरीष्ठ पातळीवर भाजप सोबत काम करणार

मी स्वत: प्रयत्नशील आहे.

विधानसभा निवडणुकीच्या वेळी मी आ.संजयमामा शिंदे यांना भाजपालाच पाठींबा द्यावा; असे सूचविले होते. ते त्यांनी मान्यही केले होते. परंतू भाजपाला बहुमत न मिळाल्याने त्यांनी बाहेरून राष्ट्रवादीला पाठींबा दिला परंतू पक्षात गेले नाही. एवढेच नाहीतर सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीला आम्ही भाजपाचेच काम केले होते. सध्या देशात भाजपा सरकार आहे म्हणूनच शांतता असून कुठेही दंगली, गोंधळ आढळत नाही. भाजपाचे काम चांगले असल्याने आम्ही वरीष्ठ पातळीवर भाजपा सोबतच काम करणार आहोत.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


किंगमेकर व माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव(भाऊ) जगताप साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा !
देशभक्त
मा.नगराध्यक्ष
मा.उपनगराध्यक्ष
युवा नेते
शुभेच्छुक
12 डिसेंबर
काकासाहेब ढवण (सर)
महेंद्र कांबळे (सर)
रमेश भोसले (सर)
नितीन विधाते(सर)
सचिन अब्दुले (सर)
चंद्रशेखर लावंड (सर)
नागनाथ क्षीरसागर(सर)
राजू वाघमारे (सर)
रफीक खान (सर)
विनोद कोरडे (सर)
आस्लम शेख(सर)


देशभक्त
मा.नगराध्यक्ष
मा.उपनगराध्यक्ष
युवा नेते
विकासप्रिय आमदार
करमाळा बाजार समितीच्या सर्वांगीण विकासाचे शिल्पकार,
महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे विद्यमान संचालक
व आमचे श्रध्दास्थान, आदरणीय माजी आमदार
मा.श्री.जयवंतरावजी जगताप साहेब
आपणांस दि.१२ डिसेंबर रोजी असलेल्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
12 डिसेंबर
सचिव, कृ.उ.बा.समिती
शुभेच्छुक
कृषी उत्पन्न बाजार समिती कर्मचारी संघटना, करमाळा
महेश ढाणे (अध्यक्ष), रविंद्र उकिरडे, अमोल नलवडे, सुरेश भांडवलकर, श्रीकांत शिंदे, श्रीकांत शिंदे
सुरेश भांडवलकर, वसंत बरडे, सलमान शेख, रतन काळे, किरण क्षीरसागर, मुकूंद सुर्यवंशी
श्री.विठ्ठल क्षीरसागर

# मोहल्ला क्लिनिक संकल्पना करमाळ्यात राबवणार : मनोज राऊत



करमाळा(सं.प्र.) : तालुक्यातील अनेक भागातील लोकांना मुले आजारी पडली तर करमाळ्याला यावे लागते. प्रवास खर्च ५०० रू. करून करमाळ्यात आल्यावर मात्र डॉक्टर वाफ देतात. याचा खर्च केवळ ३० रू. असतो. त्यामुळे अनेक पालक मुलांना दवाखान्यात आणण्यासाठी टाळतात. त्यामुळे आता त्या मशीन पंचायत समिती माध्यमातून गावोगावी उपलब्ध करून दिली आहे. तर दिल्लीतील मोहल्ला क्लिनिक च्या धर्तीवर करमाळा तालुक्यात आशा क्लिनिक ही संकल्पना राबविण्याचा प्रयत्न सुरु आहे; अशी माहिती गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी दिली.

आरोग्य क्षेत्रातील योगदानाबद्दल करमाळा तालुक्यातील साडे प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत रावगाव उपकेंद्राचे आरोग्य सेवक दिलीप डोळस यांना यंदाचा एम.बी.कोष्टी उत्कृष्ट आरोग्य सेवक पुरस्काराचे वितरण हिवताप अधिकारी डॉ.एकनाथ बोधले यांचे हस्ते करण्यात आले. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून गटविकास अधिकारी राऊत बोलत होते.

करमाळा येथील आरोग्य सेवक महादेव कोष्टी यांच्या प्रथम स्मृतिदिना निमित्त यशकल्याणी सेवाभवन मध्ये या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी अतिरिक्त जिल्हा हिवताप अधिकारी विजय बागल, तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ.श्रध्दा बोंगडे, हिवताप पर्यवेक्षक परमेश्वर वाडेकर, यशकल्याणी संस्थेचे गणेश करे-पाटील, कुरूहिन शेट्टी कोष्टी समाजाचे तालुका अध्यक्ष गजेंद्र गुरव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगदीश कोष्टी यांनी केले तर सुत्रसंचालन शिल्पा कोष्टी यांनी केले. उपस्थितांचे आभार संपत जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील गुंजेगावकर, अनिल गुंजेगावकर, मयंक कोष्टी यांनी परिश्रम घेतले.




ओजस हॉस्पिटल
OJS HOSPITAL
AllOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार
B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार
M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार
B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
* वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ *
* २४ तास अत्यावश्यक सेवा *
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार
M.sc. Biotech, Health & Nutrition आहारतज्ञ

**ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी** शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार • हृदयरोग व उच्च रक्तदाब • मधुमेह • थायरॉईड • संधिवात • पोटाचे आजार • स्त्रियांचे आजार • श्वसनसंस्थेचे आजार • मणक्यांचे व हाडांचे विकार • मुतखडा • मुळव्याध • सौंदर्य समस्या • त्वचारोग व केशविकार • आहारविषयक मार्गदर्शन..

उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत)
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)

पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. • संपर्क : मो.9960334005, 9423333950

# कोर्टी-आवाटी रस्त्याचे काम पूर्ण करा अन्यथा जनआंदोलन : नारायण पाटील



करमाळा(सं.प्र.) : कोर्टी ते आवाटी रस्त्याचे काम पूर्ण करा अन्यथा जनआंदोलन केले जाईल; असा इशारा माजी आमदार नारायण पाटील यांनी दिला याबाबत तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना रस्ता दुरुस्तीचे काम तातडीने सुरु व्हावे म्हणून लक्ष देण्याची मागणी निवेदनाव्दारे पाटील यांनी केली आहे. याबाबत अधिक माहिती देताना पाटील म्हणाले, की करमाळा तालुक्यामधून जाणारा दौंड-राशिन-कोर्टी-करमाळा- आवाटी - बार्शी असा हा मार्ग असून या राज्यमार्ग ६८ मधील किमी १३७/०० ते १८९/०० म्हणजेच कोर्टी- आवाटी रस्त्याचे काम बंद आहे. प्रशासकीय मान्यता तसेच सुमारे १६९ कोटी रूपयांची तरतूद असतानाही केवळ ठेकेदाराच्या चालढकलपणा व निष्क्रीयतेमुळे या रस्त्यावरील दुरुस्तीचे काम बंद आहे. ठेकदार हा रस्ता दुरुस्तीचे काम करण्यास नकारात्मक मानसिकता दाखवत असूनही संबंधित विभागाकडून या ठेकेदारास वारंवार मुदतवाढ दिली जात आहे. सदर ठेकेदाराने रस्त्याच्या दोन्ही बाजू अर्धवट उखडून ठेवल्यामुळे दळणवळणास धोका निर्माण होऊन अपघातांची शक्यता जास्त प्रमाणात तयार झाली आहे. यावर छोटे-मोठे अपघातही होऊ लागले आहेत. काम अर्धवट अवस्थेत असल्याने धूळीचे साम्राज्य पसरले असून वाहनचालकांना जीवावर बेतून वाहने चालवावी लागत आहेत. सध्या ऊस गाळपाचा हंगाम असून या मार्गावर ऊस वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ऊस वाहतूक करताना या मार्गावर वाहने रखडली जात असल्याने याचा परिणाम ऊसावरही होत असून रिकव्हरी आदीचा विचार केला तर भविष्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसानही होत असल्याचे दिसून येते. यामुळे शेतकरी, सर्वसामान्य नागरी व शालेय विद्यार्थ्यांना होणारा त्रास लक्षात घेऊन हा रस्ता तातडीने दुरुस्त करावा, बंद असलेले काम त्वरीत सुरु करावे. प्रशासनाने यावर गंभीरतेने विचार करून पुढील कार्यवाही न केल्यास संबंधित ठेकेदार बदलून त्यास ब्लॅकलिस्ट मध्ये टाकले जावे अन्यथा जनआंदोलन उभारले जाईल; असाही इशारा माजी आमदार नारायण पाटील यांनी दिला आहे. या रस्त्याबाबत आपण लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असल्याचेही श्री.पाटील यांनी सांगितले.

# श्री संत गजानन महाराज प्राणप्रतिष्ठेच्या वर्धापन दिनानिमित्त गणेशयाग कार्यक्रम

करमाळा(सं.प्र.) : श्री संत गजानन महाराज प्राणप्रतिष्ठेच्या वर्धापन दिनानिमित्त करमाळा शहरातील एस.टी.कॉलनी येथील श्री संत गजानन महाराज मंदिर येथे ११ डिसेंबर पासून गणेशयाग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २० डिसेंबरला वर्धापन दिन असल्याने यानिमित्त प्रवचन व महाप्रसाद वाटप कार्यक्रम होणार आहे. तरी भाविकांनी गणेशयाग या कार्यक्रमात सहभागी व्हावे; असे आवाहन मंदिर समितीने केले आहे.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
उपलब्ध सुविधा...
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
• जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
• नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार • लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स्
आमच्याकडे नंबरचे चष्मे व गॉगल्स योग्य दरात मिळतील.
बॅंक ऑफ इंडिया शेजारी, बसस्टॅन्ड समोर, करमाळा. प्रोप्रा : वर्षा गायकवाड मो.९५२७२६८१८१/७७५६८२५८२६




# सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

**करमाळा शाखा :** ए.आर.आवटे (सिनियर बँक इन्स्पेक्टर, करमाळा तालुका), एस.एन.माने (शाखाधिकारी), एस.के.रासकर (बँक इन्स्पेक्टर), ए.एस.वाघमोडे (बँक इन्स्पेक्टर),
**क्लार्क** – एस.डी.सपकाळ, आर.एच.सातारकर, आर.जी.उबाळे, व्ही.व्ही.भांगे.
**सेवक** – एस.व्ही.भिल्लारे, बी.जी.इंदुरे, एम.एस.खंडागळे, सागर शिंदे

**कोर्टी :** के.डी.कदम (शाखाधिकारी), एन.ए.सुर्यवंशी ,(बँक इन्स्पेक्टर) ए.टी.वंजाळे (क्लार्क), डी.एच.काळे (शिपाई)

**के.पारेवाडी :** डी.एस.गोरे (शाखाधिकारी), ए.व्ही.हुलगे (बँक इन्स्पेक्टर), ए.आर.तनपुरे (क्लार्क), बी.जी.ढवणे (क्लार्क)

**टाकळी(क) :** आर.एन.रणसिंग(शाखाधिकारी), आर.के.साळुंखे (क्लार्क), डी.एच.लोखंडे (सेवक)

**करमाळा शहर :** एन.एच.बागवान (शाखाधिकारी), एम.जे.शिंदे (बँक इन्स्पेक्टर), ए.एम.गोरे (क्लार्क), ए.एस.जाधव(सेवक)

**मांजरगाव :** डी.टी.पवार (शाखाधिकारी), एस.जे.धुमाळ (क्लार्क) एस.आर.जाधव (सेवक)

**चिखलठाण :** एन.जे.मुटके (शाखाधिकारी), पी.डी.मधवे (क्लार्क), यु.यु.पोळ (सेवक)

**वांगी :** आर.ई.हेंबाडे (शाखाधिकारी), एस.एस.काळे (क्लार्क)

**साडे :** आय.एस.इनामदार (शाखाधिकारी)

**कंदर :** एन.बी.गायकवाड (शाखाधिकारी), एम.एस.शिंदे (बँक इन्स्पेक्टर), ए.डी.देशमुख (क्लार्क)

**केम :** एस.व्ही.गाडे (शाखाधिकारी), ए.डी.राऊत (बँक इन्स्पेक्टर) डी.व्ही.राठोड (क्लार्क), एस.बी.उपळेकर (क्लार्क)

**गौंडरे :** एम.व्ही.शिंदे (शाखाधिकारी), आर.पी.बिबे (बँक इन्स्पेक्टर) एन.डी.काळे (क्लार्क), ए.डी.पवार (सेवक)

**जेऊर (क) :** एच.एन.जाधव(शाखाधिकारी), एम.डी.नगरे (बँक इन्स्पेक्टर),
**क्लार्क** –एस.एन.परदेशी, एस.बी.चव्हाण, व्ही.बी.पाटील, एस.व्ही.होनराव, **सेवक** – आर.पाटील

### नामसाधना शाळेत डिजीटल शाळा उद्घाटन व सत्कार सोहळा

## विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी डिजीटल शिक्षण काळाची गरज : गणेश करे-पाटील



करमाळा(सं.प्र.) : विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी डिजीटल शिक्षणही काळाची गरज आहे; असे प्रतिपादन यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील यांनी केले.

करमाळा नगरपालिकेच्या नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर न.पा.सेंट्रल स्कुल मुले नं.१ या शाळेतील डिजीटल शाळा उद्घाटन, नवनिर्वाचित शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचा सत्कार व शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार या कार्यक्रमात श्री.करे-पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न.पा.शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी, पालक आणि त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचाही सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना करे-पाटील म्हणाले, की २१ व्या शतकात वाटचाल करत असताना आजचा विद्यार्थी सर्वच दृष्टीने स्मार्ट झाला पाहिजे. तो शिकला पाहिजे. स्पर्धेच्या युगात तो टिकला पाहिजे. याकरीता अगोदर शाळा स्मार्ट झाल्या पाहिजेत. म्हणून सामाजिक ऋणाची जाण ठेवून शाळा स्मार्ट करण्याकरीता समाजातील सर्व घटकांनी पुढे आले पाहिजे.

प्रशासन अधिकारी बनसोडे म्हणाले की करमाळा शहरातील शाळांच्या व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी मी कटीबध्द असून, पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी आमचे शिक्षक समर्थपणे पार पाडत आहेत. त्या दृष्टीने मी सदैव प्रयत्नशील राहील. शहरातील सर्वच न.पा.शाळांची गुणवत्ता वाखाण्याजोगी आहे; असेही गौरवोद्गार काढले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे माजी सदस्य भागवत गर्जे यांनी मागील कालखंडाचा विचार करता स्वत: प्रेरित होऊन शाळेला पाच हजार रुपये देणगी दिली. तसेच

> करमाळा शहरातील नामवंत सेंट्रल स्कूल मुले नं.१ ही संपूर्ण शाळा डिजीटल करण्यात आली. यासाठी यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्थेने सहा स्मार्ट टिव्ही शाळेस भेट दिले. शाळेचे माजी विद्यार्थी डॉ.निलेश मोटे यांनी एक टिव्ही, बालरोग तज्ञ डॉ.वर्षा करंजकर यांनी एक टीव्ही, शाळेतील उपशिक्षिका वैशाली जगताप यांनी त्यांचा मुलगा आदित्य संतोष कांबळे हा सैनिक स्कुल सातारा व नवोदय या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल एक टीव्ही, उपशिक्षक लालासाहेब शेरे यांनी त्यांची मुलगी समृध्दी शेरे हिच्या स्मृतिप्रित्यक्ष एक टीव्ही तसेच शाळेच्या इतर सर्व शिक्षकांनी मिळून चार टीव्ही असे एकूण १४ टीव्ही व लाईट फिटींग करून घेतले. संपूर्ण शाळा डिजीटल करण्यात आली.

इतर काही पालकांनीही देणग्या दिल्या सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा.नितीन तळपाडे, भागवत गर्जे, डॉ.निलेश मोटे यांनी शाळेच्या प्रगतीविषयी समाधान व्यक्त करून शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची सूचना केली

या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण जाधव, केंद्र समन्वयक दयानंद चौधरी, बार्शी न.पा.चे शिक्षक संजय गोरे, नूतन सदस्य आसिफ जमादार, ॲड.राकेश देशमुख, नितीन दळवी, सागर वनारसे, धनंजय किरवे, महिला सदस्या तृप्ती बागल, रूपाली वायकर यांचेसह पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका सुनंदा जाधव, उपशिक्षक सुरेश कोळी, लालासाहेब शेरे, सुनिता शितोळे, सुनिता भैलुमे, धनश्री उपळेकर, सुषमा केवडकर, आशा अभंगराव, वैशाली जगताप, मंगल गलांडे, अर्चना ताटे, सुरेखा कांबळे, अश्विनी ठाकरे इ. परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लालासाहेब शेरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार शितोळे मॅडम यांनी मानले.

## पांडे येथील माजी सरपंच दत्तात्रय शेटे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : पांडे येथील माजी सरपंच दत्तात्रय शेटे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुली, एक मुलगा, सुना व नातवंडे असा परिवार आहे. करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्रा.प्रमोद शेटे यांचे ते वडील होते. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते.

३० वर्षापासून बांधकाम क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या..

**शहाणे कॉन्ट्रॅक्टर ॲन्ड सप्लायर्स**

करीता खालील पदावर

**नोकर भरती करणे आहे**

| | | |
|---|---|---|
| १ | ट्रॅक्टर ड्रायव्हर | किमान ५ वर्षे अनुभव आवश्यक |
| २ | ऑफिस क्लार्क(लेडीज) | किमान १२ वी पास, संगणक ज्ञान आवश्यक |
| ३ | साईट इंजिनियर | D.C.E किंवा B.E.civil |

संपर्क : ११३१, 'गोकुळ' निवास, खडकपुरागल्ली, करमाळा., जि.सोलापूर
मो.9423067038, 8379932662

### श्रीराम प्रतिष्ठानच्या वर्धापन दिनानिमित्त

## सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन



करमाळा(सं.प्र.): येथील श्रीराम प्रतिष्ठानच्या पाचव्या वर्धापन दिना निमित्त ११ फेब्रुवारी २०२३ रोजी सर्वधर्मिक सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे; अशी माहिती श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांनी दिली.

याबाबत माहिती देताना श्री.चिवटे म्हणाले, की वाढलेल्या महागाईमुळे कित्येक वधू-वर मायबापांना कर्ज काढून विवाहसोहळा करावा लागत आहे. पुढे जाऊन याचे रूपांतर कर्जामुळे आत्महत्येत देखील होत आहे. याचाच विचार करून मी व माझ्या सहकाऱ्यांनी सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले आहे. श्रीराम प्रतिष्ठान मार्फत सामाजिक कार्य म्हणून ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना गेली १३ वर्षापासून मोफत भात-भाजी वाटप व शहरातील गोरगरीब अनाथ वृध्दांना गेली पाच वर्षापासून दोन वेळचे जेवण देत आहोत. तसेच कोरोना काळात कोविड रूग्णांना आयुर्वेदिक काढा देऊन मदत केली. तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवत आहोत. सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात ११ फेब्रुवारी २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजता करण्यात आले आहे; अशीही माहिती भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांनी दिली.

## किरण वळेकर यांना विमा क्षेत्रातील सर्वोच्च एमडीआरटी पुरस्कार

### अमेरिका परदेश दौऱ्यासाठी निवड



करमाळा(सं.प्र.) : विमा क्षेत्रातील सर्वोच्च बहुमान एमडीआरटी-२०२३ (मिलियन डॉलर राऊंड टेबल) हा पुरस्कार जेऊर येथील किरण धनंजय वळेकर यांना मिळाला असून त्यांची अमेरिका परदेश दौऱ्यासाठी निवड झालेली आहे. जेऊर येथील मुख्य आयुर्विमा सल्लागार धनंजय वळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा बहुमान एलआयसी बार्शी शाखे अंतर्गत जेऊरला दुसऱ्यांदा मिळालेला आहे.

देशभरात एलआयसीचे १३ लाख विमा प्रतिनिधी आहेत. त्यापैकी अडीच ते तीन हजार प्रतिनिधी स्पर्धेतून पात्र होतात. तो बहुमन आपल्या ग्रामीण भागातून काम करत असणाऱ्या किरण वळेकर या महिला प्रतिनिधीस मिळाला आहे. याकामी प्रमुख विमा सल्लागार धनंजय वळेकर यांचेकडून मार्गदर्शन लाभले.

बार्शी शाखेचे शाखाधिकारी तुषार घाडगे, करमाळा शाखेचे शाखाधिकारी सुदर्शन शिरूरसकर तसेच विविध स्तरातील मान्यवरांनी किरण वळेकर यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

**शिवश्री क्लिनिक**
डे केअर सेंटर

**डॉ.आशुतोष पोपट कापले**
B.H.M.S.(M.U.H.S.) Nasik
जनरल फिजीशियन अॅन्ड होमिओपॅथिक कन्सल्टन्सी
मो.9860982072

**उपलब्ध सुविधा...**
- ॲडमिट करण्याची सुविधा.
- ई.सी.जी. सुविधा
- बालरूग्णांसाठी वाफेची सुविधा

२४ तास अत्यावश्यक सुविधा
- वेळ : सकाळी ११ ते रात्री १०

**आमची वैशिष्ट्ये....**
- सर्व आजारांवर ॲलोपॅथिक, होमिओपॅथिक उपचार.
- मुळव्याध, त्वचा विकार उपचार.
- मानसिक आजारांवर उपचार.
- नपुसंगतेवरील उपचार.
- आहारासंबधी योग्य मार्गदर्शन.
- मशीनव्दारे रक्तातील शुगर(BSL) व Blood Precesure तपासणी व उपचार.
- जुनाट मधुमेहातील जखम व संधिवात विकारांवर उपचार

टीप भारतीय सैन्य दलातील जवानांची तपासणी फी घेतली जाणार नाही.

अहमदनगर येथील प्रसिध्द किडनीविकार तज्ञ
**डॉ.आनंद काशिद** (मुत्रविकार तज्ञ, लैंगिक विकार तज्ञ व किडनी ट्रान्सप्लान्ट सर्जन)
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी, करमाळा येथे

ओपीडी वेळ सकाळी १० ते १.००

पत्ता : सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.

# मुकबधीर निवासी विद्यालयात जागतिक दिव्यांग दिन साजरा

करमाळा(सं.प.) : श्रीदेवीचामाळ येथील श्री जगदंबा कमलाभवानी मुकबधीर निवासी विद्यालयात जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विविध कार्यक्रम व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा दिव्यांग संघटनेचे उपाध्यक्ष राजेंद्र गुरव हे होते. प्रमुख पाहूणे म्हणून अस्थिरोग तज्ञ डॉ.भोसले, डॉ.सौ.भोसले, मुख्याध्यापक दत्तात्रय काळे, अधिक्षक श्री.पटणे, लिपीक आप्पा मेहेर यांचेसह सर्व शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. विविध स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट देवून त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना राजेंद्र गुरव म्हणाले, की दिव्यांगांनी जिद्दीने कोणतेही कार्य केले तर यशस्वी होते. तसेच स्वत:च्या जीवनात आलेल्या अपंगाचे कारणही सांगितले. डॉ.भोसले यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतूक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गुरमे सर यांनी केले.

## बहुजन विकास संस्थेच्या वतीने सादीक काझी यांचा सत्कार

# संस्थेचा सत्कार कार्याला गती व प्रोत्साहन देणारा : सादीक काझी

करमाळा(सं.प्र.) : सोलापूर जिल्हा महसुल कर्मचारी वर्गाची सहकारी पंस्थेच्या निवडणुकीत विजय संपादन केल्याबद्दल बहुजन विकास संस्थेच्या वतीने हाजी सादिक काझी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना काझी म्हणाले, की सामाजिक संस्थेच्या वतीने केला जाणारा सत्कार हा माझ्या कार्याला गती व प्रोत्साहन देणार आहे. सभासद, कर्मचारी व संस्थेच्या हिताच्या दृष्टीने तसेच सामाजिक उपक्रमाने काम करण्याची इच्छा आहे. म्हणूनच मला संचालक पदी निवडून देवून माझ्यावर विश्वास दाखविला, त्याला तडा न जाऊ देता विश्वासाने काम करीन.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बहुजन विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष इसाक पठाण यांनी केले. मुस्लिम आर्थिक विकासचे अध्यक्ष दस्तगीर पठाण व जमीर मुलाणी यांच्या हस्ते हाजी सादिक काझी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अजिम मोगल, लक्ष्मण भोसले, सुहास ओहोळ, विजय सुपेकर, अनिल माने, पत्रकार अशपाक सय्यद यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास मराठा सेवा संघ, भारत मुक्ती मोर्चा, दलित सेना, नागेशदादा मित्र मंडळ, खादी ग्रामोद्योगचे सर्व कार्यकर्ते तसेच बबलू पठाण, अशरफ तांबोळी, इजाज शेख, सरफराज काझी, अलिम शेख, आयुब शेख, अमीर मोमीन, अमीन बेग, तौफिक शेख, अमीर शेख, गुलाम सय्यद, अकबर सय्यद, इलाही आत्तार, सलिम पिंजारी, गणेश माळी, रूद्रा चोपडे, आर.आर.पाटील, हरूण वस्ताद, जाकिर वस्ताद, शरीफ दारूवाले, जाफर घोडके आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन बबलू पठाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार फुरकान काझी यांनी मानले.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक किसरेकर मो.९४२३५३५४४२

# नगरपालिका हद्दीतील ३४० घरांवर टांगती तलवार

## मालमत्ताधारकांना मुख्यमंत्र्याच्या भेटीला नेणार : महेश चिवटे

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात वर्षानुवर्षे नगरपालिकेच्या मालकीच्या जागेत राहणाऱ्या नागरीकांना वर्ग २ प्रमाणे मालकी हक्क देऊन त्यावर घरकुल मंजूर करावे. ही मागणी २०१९ पासून मंत्रालयात प्रलंबित असून यावर तात्काळ निकाल द्यावा; अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी निवेदन दिले होते, त्यावर मुख्यमंत्र्यांनी अहवाल सादर करा; असा रिमार्क दिला आहे. प्रधानमंत्री आवास योजना सर्वासाठी घरे २०२२ अंतर्गत शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमितपणे करणेबाबतचा प्राथमिक प्रस्ताव मला नगरपालिकेने ४ सप्टेंबर २०१९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केला होता. मौलालीचा माळ येथील २८४ व इतर भागातील ३८ अतिक्रमण क्षेत्रात असलेली निवासी घरे नियमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या दरबारी दाखल आहे. करमाळा शहरातील तब्बल ३५० अतिक्रमणातील मालमत्ताधारक यांना स्वत:च्या घराचा मालकी हक्क मिळालेला नाही. हा हक्क न मिळाल्यामुळे त्यांना घरकुलाचे अनुदान मिळत नाही.

महाराष्ट्रातील इतर नगरपालिका हद्दीत मात्र ३०-३५ वर्षापासून येथे रहायला असलेल्या नागरीकांना पंधराशे चौरस फुटापर्यंत मालकी हक्क वर्ग दोन प्रमाणे मिळाला आहे. मात्र करमाळा शहरातील अतिक्रमण भागातील झोपडपट्टी विभागातील नागरीक घरकुलापासून वंचित आहेत. यामुळे तात्काळ सर्व मालमत्ता धारकाला शासनाच्या आदेशाप्रमाणे प्रत्येकी एक हजार पाचशे चौरस मीटरचा मालकी हक्क द्यावा; अशी मागणी चिवटे यांनी केली होती. यावर मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक अहवाल सादर करा; अशा सूचना दिलेल्या आहेत. या ३५० मालमत्ताधारकांना लवकरच मुख्यमंत्र्याकडे भेटीसाठी घेऊन जाणार असल्याची माहिती जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली.

या सर्वांना स्वत:च्या मालकीचे घर मिळवण्यासाठी शिवसेना प्रयत्न करणार असल्याचेही जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी सांगितले.




माजी आमदार
मा.जयवंतराव (भाऊ) जगताप
यांना दि.१२ डिसेंबर रोजी असलेल्या वाढदिवसास...
हार्दिक शुभेच्छा
धनाजी (आबा) ढवळे
तानाजी(दादा) ढवळे
शुभेच्छुक
कमलाई वडापाव सेंटर
कमलादेवी रोड, करमाळा, जि.सोलापूर
पै.गणेश
पै.शंभुराजे
रूद्रा, वैष्णवी


प्रदेशाध्यक्ष
आमदार
देशभक्त
जिल्हाध्यक्ष
शहराध्यक्ष, रा.काँ.
12 डिसेंबर
देशाचे नेते व राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा
मा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब
किंगमेकर व माजी आमदार
मा.श्री.जयवंतरावजी जगताप साहेब
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री.अरूण टांगडे
खजिनदार, राष्ट्रवादी काँग्रेस करमाळा शहर
श्री.अरूण टांगडे


12 डिसेंबर
करमाळा तालुक्याचे किंगमेकर
व माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव(भाऊ) जगताप साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
सरपंच
श्री.महेश सोरटे
उपसरपंच
श्री.दिपक थोरबोले
सदस्य, ग्रा.पं.
श्री.सचिन शिंदे
सदस्य, ग्रा.पं.
श्री.अमोल चव्हाण
सदस्य, ग्रा.पं.
श्री.संतोष पवार
अध्यक्ष, तंटामुक्त समिती
श्री.सचिन चोरमले
समस्त ग्रामस्थ, श्रीदेवीचामाळ, ता.करमाळा.

# डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे पुरस्कार जाहीर

## ११ नोव्हेंबर रोजी पुरस्काराचे वितरण

करमाळा (सं.प्र.) : येथील डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्ष परिषदेचे महात्मा ज्योतिराव फुले तालुकास्तरीय गुणवंत शिक्षक, कर्मवीर भाऊराव पाटील उपक्रमशील शाळा, तसेच राजर्षी शाहू महाराज सामाजिक कृतज्ञता पुरसकर जाहीर करण्यात आले आहे यावेळी एमपीएससी, युपीएससी, वैद्यकिय, क्रिडा तसेच इतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर गुणवंत विद्यार्थी गुणगौरव असा विशेष सत्कार करण्यात येणार आहे; अशी माहिती संघटनेचे तालुका अध्यक्ष अजित कणसे यांनी दिली.

सदर पुरस्काराचे वितरण ११ नोव्हेंबर रोजी सकाळी अकरा वाजता यशकल्याणी सेवाभवन येथे होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे हे राहणार आहेत. प्रमुख पाहूणे म्हणून गटविकास अधिकारी मनोज राऊत, गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी जयवंत नलवडे, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, संघटनेचे प्रदेश सचिव सुनील चव्हाण, जिल्हाध्यक्ष विनोद आगलावे, मराठा सेवा संघाचे तालुका अध्यक्ष अतुल वारे, संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष अमित घोगरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

महात्मा फुले स्मृतिदिनाचे औचित्य साधून संघटने तर्फे पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन, शिष्यवृत्ती मार्गदर्शक अशा विविध विभागातील शिक्षक तसेच द्विशिक्षकी व बहुशिक्षकी शाळांना हे पुरस्कार देण्यात येतो. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पुस्तक हे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी शहाजी रंदवे, चंद्रकांत वीर, अजित कणसे, नवनाथ मस्कर, संतोष शितोळे, सुधीर माने, महेश निकत, संतोष माने, पोपट पाटील, अंकुश सुरवसे, विकास माळी, अरूण चौगुले, शरद पायघन, सुनील पवार, शरद झिंजाडे, उमराव वीर, प्रविण शिंदे, लहू चव्हाण, सोमनाथ पाटील, दादासाहेब माळी, काशिनाथ गोमे, संपत नलवडे, अशोक कणसे, दत्तात्रय जाधव, विजय बाबर, रघुनाथ फरतडे, भरत शिंदे, नाना वारे, वैशाली शेटे, सुनिता काळे, वैशाली रोकडे, वंदना जगताप, सुनिता शितोळे इ.संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

- **पुरस्कार प्राप्त शिक्षक..** वैशाली बागल, हिराबाई दळवी (अंगणवाडी क्र.२४ मांगी), महादेव शिंदे (खडकी), अतुल घोगरे (पांगरे), सतीश शहापुरे (करंजे), शहाबुद्दीन मुलाणी (कुंभेज), पंकज गोडगे (सावडी), किर्ती भापकर (वरकटणे), वर्षा आगळे (कुंभारगाव), सुजाता अनारसे (वीट), वनिता इंगोले (केतूर नं.१), दयानंद चौधरी (न.पा.मुली नं.१), सुग्रीव नीळ (हिवरे), दादासाहेब बरडे (छ.शिवाजी विद्यालय वीट), प्रा.शिवाजी वाघमोडे (भारत महाविद्यालय जेऊर)
- **उपक्रमशील शाळा :** जि.प. प्राथ. शाळा केम, जि प.प्राथ. शाळा पुजहिरावस्ती (वांगी)
- **राजर्षी शाहू महाराज सामाजिक कृतज्ञता पुरस्कार :** गणेश करे-पाटील

इथं सौंदर्य जन्म घेतं..
होलसेल साडी डेपो
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
घरगुती विक्रीसाठी साड्या होलदरात मिळतील
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186



# सालसे येथील श्रीकृष्ण येवले यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड



करमाळा(सं.प्र.) : सालसे येथील श्रीकृष्ण आप्पासो येवले यांची २०२२ ला झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाली आहे. श्रीकृष्ण येवले हे शेतकरी कुटूंबातील असून त्यांचे प्राथमिक शिक्षर जि.प.शाळा सालसे, माध्यमिक शिक्षण लाल बहादूर शास्त्री विद्यालय सालसे, उच्च माध्यमिक शिक्षण शिवाजी कॉलेज बार्शी तर पदवीचे शिक्षण मुक्त विद्यापीठातून पूर्ण झाले. २०१६ पासून नवी मुंबई येथे पोलीस खात्यात कार्यरत असणाऱ्या श्रीकृष्ण येवले यांनी प्रामाणिकपणे सेवा बजावत अभ्यास करून हे यश संपादन केले आहे. येवले यांच्या यशाची बातमी ऐकून सालसे गाव व परिसरातील नागरीकांनी तसेच येवले परिवारांनी आनंदोत्सव साजरा केले. तसेच माजी ग्रा.पं.सदस्य राजाराम येवले, माजी उपसरपंच भिमराव येवले व भाऊसाहेब येवले यांनी अभिनंदन केले.

# नामदेवराव जगताप माध्य. विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



करमाळा(सं.प्र.) : नामदेवराव जगताप माध्यमिक विद्यालय झरे येथे दहावी परीक्षा २०२२ मध्ये प्रथम तीन क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रथम क्रमांक भारती नारायण मोरे, व्दितीय क्रमांक शिवानी संतोष शिंदे, तृतीय क्रमांक राजनंदिनी रामभाऊ घाडगे या विद्यार्थ्यांना यशकल्याणी सेवाभावी संस्थेच्या वतीने गणेश करे-पाटील यांचे हस्ते प्रमाणपत्र, सुवर्णपदक व अनुक्रमे ३०००, २००० व १००० रू. चा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी करे-पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रबोधन केले. हा उपक्रम दरवर्षी चालू राहणार असल्याचे सांगत त्यांनी इतरांना प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन चव्हाण यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकवर्ग उपस्थित होते.

श्री संत गजानन महाराज मोबाईल शॉपी
Mo.9420920007
0% व्याजदरात सर्व मोबाईल उपलब्ध
BAJAJ FINSERV
TVS CREDIT
ब्रॅन्डेड मोबाईल विक्री
SAMSUNG VIVO NOKIA iPhone OPPO itel
Mo.8855854009
श्री संत गजानन इलेक्ट्रीकल ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स
जय महाराष्ट्र चौका जवळ, मेन रोड, करमाळा.
मो.9420920007, 8855854009

॥ श्रीराम समर्थ ॥
श्री गजानन आयुर्वेद
मल्टीस्पेशालिटी स्पाईन ऑर्थो केअर सेंटर
डॉ.श्री.दिपक सुर्यकांत पाटील एम.डी.(आयुर्वेद), पुणे
I.S.O.9001-2018 Certified
डॉ.सौ.वैष्णवी दिपक पाटील आयुर्वेदाचार्य (मुंबई)
आयुर्वेदाचे वरदान-ऋतू बदलानूसार 'पंचकर्म' व्दारे शरीरशुध्दी
- वमन/विरेचन -
खालील आजारावर उपयुक्त... वाढलेले वजन, आम्लपित्त, जुनी सर्दी, पिंपल्स कफाचा त्रास, पोटाच्या तक्रारी, स्किन इन्फेक्शन सोरियासिस, Eczema, वाढलेली उष्णता, स्त्रीयांमधील पाळीच्या तक्रारी P.C.O.D., स्त्री-पुरूष वंध्यत्व, थायरॉइडचा त्रास इ.
उपलब्ध सुविधा... • प्रकृतीपरिक्षण-नाडीपरिक्षण • पंचकर्मव्दारे शरीरशुध्दी • प्रतिकारशक्ती वाढविणारी रसायन चिकित्सा • ऋतुचर्या-दिनचर्या मार्गदर्शन • अनुभवी प्रशिक्षित केरळीयन पंचकर्म स्टाफ
पत्ता : 'श्रीस्मरण', बिल्डींग, शाहूनगर(सेकंड लेन), श्रीकमलाभवानी रोड, करमाळा.
मो.9822997409 / 9970765945
www.spineorthoayurved.com shrideepak17@gmail.com shrigajananayurved Shri Gajanan Ayurved Multispecialty Spira Ortha Care


तत्वनिष्ठ राजकारणी
किंगमेकर व माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव जगताप साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
• राजे शिवछत्रपती मंडळ, करमाळा. • व्ही.जे.ग्रुप, करमाळा

### साहित्यिका प्रतिभा बोबे व सारीका बोबे यांना
# हिरकणी राज्यस्तरीय साहित्यसाधना पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.): येथील कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक नारायण गणपत बोबे यांच्या कन्या व साहित्यिका प्रतिभा नारायण बोबे (राहूरी) व सारीका नारायण बोबे (बार्शी) यांना मानाचा 'हिरकणी राज्यस्तरीय साहित्यसाधना' पुरस्कार मिळाला आहे. तसेच बहाई अकादमी पाचगणी (ता.महाबळेश्वर) यांचे वतीने आयोजित 'इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये त्यांच्या काव्यसंग्रहाची नोंद झाली आहे. हिरकणी साहित्यसाधना पुरस्काराचा नाविण्य–पूर्ण सोहळा पाचगणी येथे नुकताच पार पडला. यावेळी त्यांच्या अनुक्रमे आम्ही 'वाद्यवृंद' व 'लेखणीची देणगी' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. या दोघींना इंडियन बुक ऑफ रेकॉर्डचे मानपत्र, मेडल, ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. हिरकणी समुहाच्या वनमालाताई पाटील, डॉ.सुनिल पाटील, बहाई अकादमीचे लेसन अझीज, डॉ.राधा रोस्ट, डॉ.विद्या ठक्कर यांचे हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. हा पुरस्कार या दोघींनीही वडील नारायण बोबे व आई विद्या बोबे यांना समर्पित केला आहे.

# शेटफळ येथे कृषी विभागाच्या वतीने पाचट व्यवस्थापन अभियान



करमाळा(सं.प्र.) : शेटफळ येथे कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना शेतावर जाऊन ऊसाचे पाचट व्यवस्थापन विषयी प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने सोलापूर जिल्ह्यात सध्या ऊस पाचट व्यवस्थापन अभियान राबविण्यात येत आहे. करमाळा तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी संजय वाकडे यांचे मार्गदर्शनाखाली शेटफळ येथे शेतकऱ्यांना शेतावर पाचट व्यवस्थापनाची प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आली. यावेळी कृषी विभागाच्या रोहिणी सरडे यांनी उपस्थितांना पाचट राखण्याचे फायदे याविषयी मार्गदर्शन केले तर कृषी सहाय्यक सुप्रिया शेलार यांनी कृषी विभागाच्या वतने राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती एकत्र मिळवण्यासाठी कृषक ॲपचा वापर करण्याचे आवाहन शेतकऱ्यांना केले. यावेळी ऊसाच्या एक एकर क्षेत्रामधील पाच ते सहा टन पाचटापासून दोन ते तीन टन उत्तम कंपोस्ट खत मिळते. पाचट ठेवल्याने पाणी वीज यामध्ये बचत होऊन मशागतीचा खर्चही कमी होतो. यावेळी पाचट कुजवण्याच्या विविध पध्दतीची माहिती देऊन ऊसाचे उत्पादन पाच ते सहा टनाने वाढत असल्याने योग्य पाचट व्यवस्थापनाची गरज असल्याचे प्रतिपादन सरडे यांनी केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी ऊसाचे पाचट न जाळण्याचा निर्धार केला. याप्रसंगी शेतकरी गटाचे वैभव पोळ, मकाई कारखाना शेती विभागाचे ॲग्री सुपरवायझर गजेंद्र पोळ, प्रशांत नाईकनवरे, बाळासाहेब पोळ, नानासाहेब साळुंके, गणेश पोळ, राजेंद्र साबळे, सुहास पोळ, लहू पोळ व शेतकरी उपस्थित होते.

**ऑफिससाठी कामगार पाहिजे**
ऑफिस मधील विविध कामासाठी कामगार पाहिजे. किमान १० वी/१२ वी पास असलेल्या गरजूंनी त्वरीत संपर्क साधावा
**संपर्क : मो.9822058106, 9423237685, 9423337480**

# दिग्विजय बागल यांचे बाजार समितीचे संचालक पद कायम



करमाळा(सं.प्र.) : मकाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन दिग्विजय बागल यांचे रद्द करण्यात आलेले करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पद कायम राहिले आहे. त्यांचे पद घालवण्यासाठी वर्षभरापासून विरोधी गटात धुमसान सुरू होते. बागल यांचे संचालक पद कायम राहिल्याने बागल गटात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मंत्री तानाजी सावंत यांच्यामुळे हे पद कायम राहिल्याचे सांगण्यात येत आहे. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये धान्य विकायला येणाऱ्या व इतर वाहनांची प्रवेश फी माफ करण्यासारखे इतर अनेक महत्वपूर्ण व लोकहिताचे निर्णय बागल यांच्या नेतृत्वात बाजार समितीमध्ये घेण्यात आले होते. आगामी काळातही बागल गटाची भुमिका लोकोपयोगी कामे करण्यासाठी महत्वपूर्ण असणार आहे; असेही बागल गटाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# उमरड येथे महिला शेतीशाळेचे आयोजन



करमाळा(सं.प्र.) : उमरड येथे महिला शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर शेतीशाळा वर्गामध्ये मका उत्पादक महिला शेतकऱ्यांना तालुका कृषी अधिकारी संजय वाकडे व राजेंद्र बनसोडे यांनी एकात्मिक कीड व्यवस्थापन, खताचा संतुलित वापर, ऊस पाचट व्यवस्थापन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी उमरडचे सरपंच लालासाहेब पडवळे, प्रमोद बदे व शेतकरी बांधव, महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन कृषी सहायक प्रतिक सरडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार कृषी सहय्यक महेश राजूण यांनी मानले. शेतीशाळेसाठी बाळू घनवट व आण्णा पडवळे यांनी परिश्रम घेतले.

# वेताळपेठ येथील श्रीराम मंदिर जीर्णोध्दाराचे काम सुरू
## जिर्णोध्दार समितीचे आर्थिक मदतीसाठी आवाहन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील वेताळपेठ येथील वीर चौकात असलेल्या श्रीराम मंदिराचा जीर्णोध्दार होत असून आत्तापर्यंत मंदिराचे स्लॅपपर्यंत बांधकाम झाले आहे.

भिंतींना गिलावा, श्रीरामचे आतील मंदिर, स्टाईल फरशी, दरवाजे आदी रेखीव काम राहिलेले आहे. तरी ज्यांना मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी आर्थिक स्वरूपात किंवा वस्तू स्वरूपात मदत करायची आहे; अशा दानशूर व्यक्तींनी विजय देशपांडे (९४२०७८२९९८), राधेशाम देवी (९४२३३२६५८६), महेश परदेशी (७०३०५६०४६०), दर्शन कुलकर्णी (९८८१५८५००१), रूपेश वनारसे (९४२१०७०७२५) यांच्याशी संपर्क साधावा; असे आवाहन श्रीराम मंदिर जीर्णोध्दार समितीने केले आहे.

## साहित्यिकांना आवाहन

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय सा.कमलाभवानी संदेशचा वर्धापन दिन विशेषांक लवकरच प्रकाशित होणार आहे. तरी साहित्यिकांनी आपले साहित्य लेख, कविता, चारोळी व इतर तसेच जाहिरातदारांनी आपल्या जाहिराती सा.संदेश कार्यालयात आणून द्यावेत.

**संपर्क : मो.९८२२०५८१०६**
**मो.९४२३२३७६८५**



12 डिसेंबर
देशभक्त
नगराध्यक्ष
मा.उपनगराध्यक्ष
युवा नेते
करमाळा तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष
मा.आ.श्री.जयवंतरावजी जगताप(साहेब)
यांना वाढदिवसाच्या...
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मा.आ.श्री.जयवंतराव जगताप प्रतिष्ठान, कंदर
संस्थापक/अध्यक्ष – आण्णासाहेब पंडित पवार
आण्णासाहेब पंडित पवार




12 डिसेंबर
किंगमेकर व माजी आमदार
मा.श्री.जयवंतरावजी
जगताप साहेब
यांना वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
गुरुदत्त एंटरप्रायजेस्
करमाळा., जि.सोलापूर
श्री.नानासाहेब मोरे
श्री.भरत(भाऊ) आवताडे

# ॥ प्रथम पुण्यस्मरण ॥



नाही समजली देवाची खेळी,
निरोप घेतला अवेळी।
क्षणोक्षणी आठवण येते मनोमनी,
नकळत उजळती आश्रु नयनी ॥

## कै.बाजीराव माणिकराव मारकड-पाटील

यांचे **प्रथम पुण्यस्मरण** सोमवार दि.१२/१२/२०२२ रोजी दुपारी १२ वा. ०१ मि.करण्याचे योजिले आहे. तरी यावेळी पुष्पांजली वाहण्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**टीप : ह.भ.प.ॲड.बाबूराव हिरडे महाराज यांचे स.१० ते १२ किर्तन होईल.**

● स्थळ : उमरड, ता.करमाळा., जि.सोलापूर ●

आपले नम्र
**श्री.जिजाबापू बाजीराव मारकड, श्री.संदीप बाजीराव मारकड**
**समस्त मारकड-पाटील परिवार, उमरड**






तत्वनिष्ठ नेता व माजी आमदार
## मा.जयवंतराव जगताप साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त
## हार्दिक शुभेच्छा !

12 डिसेंबर




श्री.बाळकृष्ण पाटील सर
पर्यवेक्षक, म.गांधी विद्यालय
सदस्य, कुंभारगाव सोसा.
सदस्य, खरेदी-विक्री संघ

सौ.आशा बाळकृष्ण पाटील

डॉ.ऋषीकेश बाळकृष्ण पाटील
(प्राथ.आरोग्य केंद्र साडे)

डॉ.स्नेहल ऋषीकेश पाटील
(प्राथ.आरोग्य केंद्र कोर्टी)

डॉ.ऋतुजा बाळकृष्ण पाटील
(Emso, B.V.G.group)

शुभेच्छुक
**पाटील परिवार, केत्तूर/करमाळा**






किंगमेकर व माजी आमदार
## मा.जयवंतराव जगताप
आपणांस वाढदिवसानिमित्त
## हार्दिक शुभेच्छा

12 डिसेंबर






श्री.प्रशांत ढाळे (मा.नगराध्यक्ष)

शुभेच्छुक
## गजानन
**स्पोर्टस् ॲन्ड सोशल क्लब**
वेताळपेठ, करमाळा.

# शिवभक्तांच्या आवाहनाला करमाळा तालुक्यातून शंभर टक्के प्रतिसाद

करमाळा(सं.प्र.) : छत्रपती शिवाजी महाराज व इतर महापुरूषांवर बदनामीकारक व इतिहासाची छेडछाड केल्याप्रकरणी तसेच केलेल्या वक्तव्याचा करमाळ्यात निषेध व्यक्त करीत करमाळा बंदची हाक देण्यात आली. यावेळी शहर मर्यादित हा बंद पुकारण्यात आला होता. मात्र तालुक्यातील ग्रामीण भागांनीही याला प्रतिसाद देत सर्वच गावांनी शंभर टक्के बंद पाळला आहे.

या आंदोलनानिमित्त सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक घालून शहरतील सर्व पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. करमाळा तालुक्यातील सर्व पक्षीय संघटनार, आरपीआय, मुस्लिम संघटना, संभाजी ब्रिगेड यासह सर्वच सामाजिक संघटनांनी करमाळा बंदला जाहीर पाठींबा दिला. शहरातील व्यापाऱ्यांनीही शंभर टक्के बंद पाळत या आंदोलनास प्रतिसाद दिला. सकाळी दहाच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ सर्व शिवभक्तांनी गोळा होत शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करून शहरातून रॅली काढण्यात आली.

महाराष्ट्रामध्ये सध्या राजकीय स्थीरतेचे भान कोणालाच राहिले नसून त्यामध्ये संविधानिक पदावर असलेले राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी महापुरूषांबद्दल वारंवार अपमानजनक वक्तव्य करून वाद-विवाद व सामाजिक अस्थिरता निर्माण केली. त्यामुळे त्यांची राज्यपाल पदावरून हकालपट्टी करण्यात यावी. तसेच भाजपा प्रवक्ता सुधांशू त्रिवेदी, प्रसाद लाड, रावसाहेब दानवे, मंगलप्रसाद लोढा यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी; अशी मागणी निवेदनात करण्यात आली होती. त्या अनुषंगाने करमाळा बंद पाळण्यात आला. यावेळी संबंधितांच्या विरोधात घोषणाही देण्यात आला.

# नेत्रचिकित्सा व सर्वरोग निदान महा आरोग्य शिबीर संपन्न



करमाळा (सं.प्र.) : माजी आमदार जयवंतराव जगताप व युवा नेते शंभुराजे जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त करमाळा शहर व तालुक्यातील नागरीकांसाठी नेत्र चिकित्सा व सर्वरोग निदान महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शेकडो रूग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या स्वागतानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी यशकल्याणीचे गणेश करे-पाटील, युवा नेते शंभुराजे जगताप, आदिनाथचे माजी संचालक दशरथ कांबळे यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर फीत कापून महाआरोग्य शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबीरात अहमदनगर येथील साईदिप हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर डॉ.श्रीधर बदे (हृदयरोग तज्ञ), डॉ.भुषण खर्चे (मेंदूरोग व मणका तज्ञ), डॉ.अभिजीत सिंगल (अस्थिरोग तज्ञ), डॉ.मेहवाश शेख (बालरोग तज्ञ), डॉ.ऋषिकेश मावळे (मधूमेह व हृदयरोग तज्ञ), डॉ.श्रीमंत भालेराव (मेडिकल कोऑर्डिनेटर), डॉ.मनोज कुंभार (कन्सल्टींग फिजीशियन), डॉ.रोहन कुंभार (स्त्रीरोग तज्ञ), डॉ.आशुतोष कापले, एच.व्ही. हॉस्पिटल पुणे येथील नेत्रचिकित्सक उदय झुरळे, दिपक सादिगले आदींनी रूग्णांची तपासणी करून उपचार केले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी बोंडवे मॅडम, ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष अॅड.बाबूराव हिरडे, मुख्याधिकारी बालाजी लोंढे, सुधाकर लावंड, झनकशेठ परदेशी, बालरोग तज्ञ डॉ.प्रशांत करंजकर, डॉ.श्रीराम परदेशी, बाजार समितीचे संचालक सदाशिव पाटील, गटसचिव नेते बबन मेहेर, अमेय परदेशी, गणेश झोळ, भैरवनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक माने सर, अल्पसंख्यांक आघाडीचे युसूफ शेख, अॅड.नवनाथ राखुंडे, सचिन क्षीरसागर, सरपंच बबन काळे-पाटील, सरपंच सोरटे, उपसरपंच दिपक थोरबोले, प्राचार्य पोपट कापले, उपप्राचार्य बागवान सर, दत्तात्रय शिर्के, पायघन भाऊसाहेब, थोरात भाऊसाहेब, जाधव भाऊसाहेब,दळवे भाऊसाहेब, शुभम कात्रेला संदीप पवार आदी उपस्थित होते.

# गुळसडीची सुंदरजीवनची केळी दुबईला रवाना

करमाळा (सं.प्र.) : सुंदरजीवन कॅटल फिडस्चे मालक राजुकाका शियाळ यांचे चिरंजीव सुचित शियाळ, सतीश बागल, शंकर क्षीरसागर या तरूण युवकांनी गुळसडी येथील उजाड माळरानावर केळीची बाग फुलवली असून, त्यांच्या केळीला २७ रू. ५० पैसे भाव मिळाला आहे. करमाळा तालुक्यातील केळी उत्पादनात विक्रमी भाव मिळाला असून तरूण शेतकऱ्यांच्या डोळ्यात अंजण घालण्याचे काम केले आहे. त्यांनी उत्पादीत केलेली केळी वंडर या कंपनीने खरेदी करून दुबईला रवना झाली आहेत. आजची पिढी म्हणते शेती परवडत नाही. शेती म्हणजे तोट्याचा व्यवसाय आहे. शेती करण्यापेक्षा उद्योग व्यवसाय केलेला बरा..! अशी समजूत असल्यामुळे तरूण वर्ग शेती करण्याकडे धजावत नाही. अशा परिस्थितीत जिद्द, चिकाटी, परिश्रम घेऊन शेती आधुनिक पध्दतीने केल्यास निश्चित यश मिळते. याचे उत्तम उदाहरण असून तरूण युवा शेतकऱ्यांनी शेतीकडे वळून याची प्रेरणा घेऊन आधुनिक पध्दतीने शेती करून आपले सुंदरजीवन समृध्द करावे; हीच शिकवण या तरूण शेतकऱ्यांनी दिली आहे. त्यांच्या या यशाबद्दल मनसचे अध्यक्ष नानासाहेब मोरे, महादेव फंड, डॉ.महेश वीर, महेश गवळी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहेत.

# केडगाव जि.प.शाळेचा 'आनंद बाजार' स्तुत्य उपक्रम

करमाळा(सं.प्र.) : विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमाबरोबरच दैनंदिन जीवनात हिशोब व आकडेमोड करता यावी; याउद्देशाने केडगाव जिल्हापरिषद प्राथमिक शाळेत आनंद बाजार आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरूवात सरपंच वर्षाताई पवार यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. आनंद बाजार उपक्रमाचे उद्घाटन यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील यांचे हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी पहिली ते सातवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी भाजीपाला, फळभाज्या, स्टेशनरी साहित्य, भेळ, शेंगा लाडू, चणे फुटाणे, वडापाव, चहा, वाटाणे, फुटाणे असे स्नॅक्सचे विविध स्टॉल विद्यार्थ्यांनी लावले होते. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवाजी बोराडे, उपाध्यक्ष संतोष मस्तुद, सदस्य गणेश कानगुडे, विश्वास बोराडे, नागनाथ बोराडे, रविराज शिंदे, ज्ञानेश्वर माळी, सरपंच वर्षाताई पवार, ग्रा.पं.सदस्य तसेच माता-पालक यांनी आनंद बाजारला भेट देऊन अनेक वस्तू व खाद्यपदार्थांची खरेदी केली.शाळेने राबविलेला आनंद बाजार हा उपक्रम अतिशय स्तुत्य असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून खाऊसाठी ज्ञानेश्वर माऊली सहकारी दूध संस्थेचे प्रवर्तक नामदेव शिंदे व गोरख बोराडे यांनी प्रत्येकी ५०१ रू.ची वर्गणी दिली. अनुकरणीय उपक्रम हाती घेऊन यशस्वी राबविल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका तथा चिखलठाण केंद्राच्या केंद्रप्रमुख वंदना पांडव व सर्व शिक्षक वर्गाचे अभिनंदन केले. ग्रामस्थ व पालकांच्या उत्तम प्रतिसादातून या उपक्रमांतर्गत तब्बल दहा हजार रूपयाची उलाढाल झाली. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना यशकल्याणी तर्फे प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे सभापती अतुल पाटील, गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, विस्तार अधिकारी जयवंत नलावडे, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख भारत पांडव, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, ग्रा.पं.सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी केंद्रप्रमुख वंदना पांडव, संतोष मंजुळे, दिपक लांडगे, श्रीमती कुंभार, चव्हाण मॅडम आदींनी परिश्रम घेतले.

# करमाळा तालुक्यातील दत्तकलाच्या पहिल्या व्यावसायिक महाविद्यालयास शासन मान्यता

करमाळा(सं.प्र.) : केत्तूर येथील दत्तकला शिक्षण संस्थेच्या दत्तकला इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयामध्ये डी.फार्मसी पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली व राज्य शासनाने मान्यता दिली आहे. हे महाविद्यालय करमाळा तालुका व परिसरातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे संकुल चालू करणारे हे पहिलेच महाविद्यालय आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने याबाबतचा निर्णय जाहीर करण्यात आला. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई या मंडळाशी दत्तकला शिक्षण संस्थेचे दत्तकला इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी हे महाविद्यालय संलग्नीत आहे. हा पदविका अभ्यासक्रम (डी.फार्मसी) सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यास केंद्र व राज्य शासनाने मान्यता दिली आहे. तालुक्यातील विद्यार्थ्यांना व इतर तालुक्यात व जिल्ह्यात व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शिक्षणाच्या प्रवेशासाठी जावे लागत असे. त्यासाठी विद्यार्थ्यांना या संकुलाच्या माध्यमातून ती अडचण दूर करून ही सोय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना करून देण्यात आली आहे; असे दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, उपाध्यक्ष राणा सुर्यवंशी, सचिव माया झोळ यांनी सांगितले.

सदर पदविका अभ्यासक्रमाची(डी फार्मसी) प्रवेश प्रक्रिया व शुल्क निश्चिती आणि शिक्षण विषयक कार्यप्रणाली यांचे सनियंत्रण करण्याचे अधिकारी महाराष्ट्र शासनाचे तंत्रशिक्षण संचलनालय यांना राहणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची प्रवेश प्रक्रिया चालू झालेली असून, या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांनी संस्थेशी संपर्क साधावा व प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत तंत्रशिक्षण संचालनाच्या www.dte.org.in या संकेतस्थळावर भेट द्यावी; असे आवाहन संस्थेच्या सचिव माया झोळ यांनी केले आहे.

**लक्ष्मी वैभव गॅस एजन्सी, करमाळा**

**पुरुष कामगार पाहिजे**

आमचे येथे खालीलप्रमाणे जागा भरणे आहेत.

१) **डिलेव्हरी स्टॉफ** - कमीत कमी १० वी पास, ड्रायव्हींग लायसन्स आवश्यक

२) **मॅकेनिक/ग्राहक सर्व्हे स्टॉफ** - १० वी पास, सेल्सचा अनुभव असल्यास प्राधान्य

३) **हमाल** - गोडाऊन कामासाठी

टीप : सदर कामगार कोणतेही व्यसन नसलेला व पोलीस रेकॉर्ड नसलेला पाहिजे.

पगार व इतर कामाचे स्वरूपासाठी खालील नंबरवर संपर्क साधावा..!

**संपर्क : 8087374374**











# एस.एस.के.एस. असोसिएटस्

## अकौंट मॅनेजर पाहिजेत

सीए फर्म मध्ये अकौंटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)

**पदासाठी अटी खालीलप्रमाणे..**

- **कामाची वेळ :** सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
- **पात्रता :** कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
- **पगार :** ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.

**संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)**

**पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टासमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.**

टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.







## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जागतिक स्तरावरील ज्ञानाचे प्रतिक : शरद पवार




करमाळा(सं.प्र.) : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान हे जागतिक पातळीवरील सर्वात मोठे लोकशाही संविधान आहे; असे मत मातंग एकता आंदोलनाचे तालुका अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले.

रावगाव येथील राजीव गांधी सार्वजनिक वाचनालयात आयोजित केलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त ते प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, की विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान हे जगाला तारू शकते. नको राजेशाही, नको ठोकशाही, संविधानाने दिली लोकशाही असे त्यांनी म्हटले आहे. यावेळी संविधान दिनानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण श्री.पवार यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी वाचनालयाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आधारीत ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या कार्यक्रमास महेंद्र शिंदे, मधुकर पवार, राऊत गुरूजी, वैशाली महाजन, प्रिया वीर, विद्या गंभीर, निर्मला पाटोळे, चव्हाण मॅडम, प्रकाश कांबळे, आल्हाट यांचेसह शालेय विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार वाचनालयाचे सचिव भास्कर पवार यांनी मानले.

## केत्तूर नं.२ येथील दत्त मंदिरात योग शिबीर संपन्न



करमाळा(सं.प्र.) : पतंजली योग समिती करमाळा, पंतजली योग समिती इंदापूर आणि केत्तूर नं.२ येथील ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने केत्तूर नं.२ येथील दत्त मंदिरात योग शिबीर घेण्यात आले. कै.धोंडोपंत दादा यांच्या कृपाशिर्वादाने चालू झालेल्या अखंड हरिनाम सप्ताह व तिसरा तपपूर्ती सोहळा निमित्ताने योग शिबीर घेण्यात आले. या शिबीराची सांगता औषधीय यज्ञ करून योग प्राणायाम शिबीराची सांगता करण्यात आली. यावेळी नियमित योग वर्ग सुरू ठेवण्यासाठी ग्राम समितीची स्थापना करण्यात आली. करमाळा स्वाभिमान तालुका प्रभारी हनुमानसिंग परदेशी, पतंजली योग इंदापूर तालुका प्रभारी मल्हारी घाडगे, किसान प्रभारी चंद्रकांत देवकर यांनी शिबीरार्थींना मार्गदर्शन केले. सांगता कार्यक्रमासाठी करमाळा तालुका कोषाध्यक्ष दिपक कटारिया, पतंजली योग करमाळा तालुका प्रभारी बाळासाहेब नरारे, करमाळा तालुका किसान प्रभारी रामचंद्र कदम, युवा प्रभारी प्रविण देवी उपस्थित होते. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी विवेक निसळ, ज्ञानदेव जाधव, महेश येवले, बाळासाहेब महानवर, रावसाहेब जरांडे, विठ्ठल राऊत यांनी परिश्रम घेतले.

## तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत दत्तकला आयडियल स्कुलचे यश

करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथे आयोजित केलेल्या तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत १०० व २०० मीटर रनिंग मध्ये दत्तकला आयडियल स्कुल ॲन्ड ज्युनियर कॉलेज केत्तूर च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. यामध्ये गोविंद गोरख पाखरे व जानव्ही वसंत भोईटे यांचा समावेश आहे. या दोघांची १४ वर्षे वयोगटात जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन दत्तकला शिक्षण संस्थेचे





अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, सचिवा माया झोळ, स्कूल डायरेक्टर प्रा.नंदा ताटे, आयडियल स्कुलचे प्राचार्य विजय मारकड यांनी केले.

## आनंद दास यांची मंत्रालय सहाय्यक कक्ष अधिकारी पदी निवड



करमाळा(सं.प्र.) : साडे येथील आनंद विकास दास यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून मंत्रालय सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

आनंद दास हे साडे येथील कै.सुभाष पाटील पतसंस्थेचे व्यवस्थापक विकास दास यांचे चिरंजीव आहेत. त्यांचे मुळ गाव रोपळे हे आहे. पण त्यांचा जन्म व शिक्षण हे साडे येथेच झाले आहे. विकास दास यांचेही संपूर्ण कारकिर्द साडे पतसंस्थेच्या माध्यमातून झालेली आहे. आनंद दास यांचे आठवी पर्यंतचे शिक्षण साडे हायस्कुल साडे तर माध्यमिक शिक्षण महाराष्ट्र विद्यालय बार्शी येथे तर बी.एस्सी ॲग्रीचे शिक्षण अकलुज येथे झाले असून राजुरी येथील कृषी विद्यापीठात एम.एस्सी ॲग्री झाले आहे. एमपीएससी मार्फत दिलेल्या सहाय्यक कक्ष अधिकारी पदाच्या परीक्षेत ते उत्तीर्ण झाले असून त्यांना मंत्रालयात काम करण्याची संधी मिळाली. जिद्द, चिकाटी व अधिकारी होण्याचे ध्येय समोर ठेवून आनंद दास यांनी आपले वडील विकास दास यांचे स्वप्नं पूर्ण केले आहे. विकास दास यांनी अत्यंत संघर्ष करून आनंद यास शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले आहेत व संघर्षातून त्यांनी पतसंस्थेला नावलौकीक मिळवण्यासाठी प्रयत्न केला आहे. आनंद यांच्या या निवडीने विकास दास यांच्या कष्टाचे सार्थक झाले असून त्यांना खऱ्या अर्थाने आनंद झाला आहे. निवडीबद्दल त्यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने उमरड येथे डॉ.आंबेडकर यांना अभिवादन

करमाळा(सं.प्र.) : उमरड ग्रामपंचायत व परिवर्तन ग्रुप उमरड यांच्या संयुक्त विद्यमाने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात प्रथम बाबासाहेबांच्या प्रतिमेला रामचंद्र पडवळे, भानुदास कोठावळे, दादा पाटील यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. नंदकिशोर वलटे यांनी बाबासाहेबांच्या स्वाभिमानी विचारांची सर्व जनतेला गरज आहे. त्यांनी अखिल मानवजाती साठी भरीव कार्य केले आहे. त्यांचे हे उपकार कधीही फिटणार नाहीत; असे मत व्यक्त केले. यावेळी वामनराव बदे, सरपंच बापूराव पडवळे, चेअरमन डी.जी.बदे, श्रीमान चौधरी, बापूराव कोठावळे, संदीप मारकड, जनार्धन मारकड, प्रमोद बदे, मुकेश बदे, पोलीस पाटील अंकुश कोठावळे, सुनील बदे, अमोल कांबळे, सतीश चांदणे, आशपाक पठाण तसेच परिवर्तन ग्रुपचे संतोष पाखरे, पोपट कदम, गौतम कदम, महेंद्र पाखरे, आनंद कसबे, फय्याज पठाण, अभिजीत पाखरे उपस्थित होते.

## करमाळा शहर व तालुक्यात दत्त जयंती उत्सव उत्साहात साजरा



करमाळा (सं.प्र.) : करमाळा शहरात विविध ठिकाणी दत्त जयंती उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमाने व महाप्रसाद वाटपाने उत्साहात साजरा करण्यात आला. दत्तजयंतीनिमित्त माळीगल्ली येथील श्री दत्तकृपा मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम व महाप्रसाद वाटप इ. कार्यक्रम संपन्न झाले. विकासनगर येथील दत्तमंदिरात अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला होता. दत्तपेठ येथील एकमुखी दत्तमंदिरात किर्तन विशारद ह.भ.प.मयुरी घेवारी (चिंचवड पुणे) यांचे दत्तजन्माचे किर्तन, दहिहंडी काल्याचे किर्तन व महाप्रसाद वाटप करण्यात आला. किल्ला विभाग येथील दत्तमंदिरात दत्तजयंती निमित्त श्री आरती, महिलांचा गीत गायनाचा कार्यक्रम व प्रसाद वाटप करण्यात आला. तसेच मंदिरावर आकर्षक विद्यूत रोषणाई करण्यात आली होती. श्री च्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. तसेच करमाळा तालुक्यातील वाघाचीवाडी, औताडे वस्ती फिसरे, केत्तूर नं.२, सालसे येथील घाडगे वस्ती, श्रीदेवीचामाळ, चिखलठाण, जेऊर, झरे, कंदर, केम, वीट, येथे दत्तजयंती उत्सव साजरा करण्यात आला

## जेऊर येथील श्रीधर पाथ्रुडकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथील रहिवाशी व पुणे येथे स्थायिक असलेले श्रीधर प्रदीप पाथ्रुडकर (वय-२७) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे आई-वडील, आजी, चुलते असा परिवार आहे. कै.श्रीधर हा प्रदीप पाथ्रुडकर यांचा एकुलता एक मुलगा होता. जेऊर ग्रामपंचायत सदस्य उमेश पाथ्रुडकर यांचे ते चुलत बंधू व स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे सचिव प्रशांत पाथ्रुडकर यांचा पुतण्या होता.


किंगमेकर/माजी आमदार
देशभक्त
12 डिसेंबर
तालुक्याचे किंगमेकर/माजी आमदार
मा.श्री.
जयवंतराव जगताप साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त लाख.. लाख.. हार्दिक शुभेच्छा !
प्राचार्य
श्री.पी.ए.कापले
उपप्राचार्य
श्री.ए.एच.बागवान
पर्यवेक्षक
श्री.एस.टी.शिंदे
पर्यवेक्षक
श्री.बी.के.पाटील
उच्च माध्य.विभागप्रमुख
श्री.व्ही.एल.पवार
शुभेच्छुक
महात्मा गांधी माध्य., उच्च माध्यमिक व तांत्रिक प्रशाला, करमाळा.
सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी

# एक तत्वनिष्ठ राजकारणी !

करमाळा तालुक्याच्या राजकारणात १९८५ साली सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते देशभक्त नामदेवरावजी जगताप यांच्या निधनामुळे फार मोठी पोकळी निर्माण झाली. जगताप गट तर नेतृत्वाविना अक्षरश: पोरका झाला. अशातच जयवंतराव जगताप हे नुकतेच कोल्हापूरहून मल्लविद्येचे शिक्षण घेवून आलेले होते. कै.नामदेवराव जगताप यांचे तत्कालीन निष्ठावंत सहकारी शंकरराव भांगे, कै.भगवानराव शिंदे, भागवतराव बागल व अन्य कार्यकर्त्यांनी जयवंतराव जगताप यांच्यातील नेतृत्वगुण हेरले व वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी त्यांना शिक्षण संस्थेच्या चेअरमन पदी विराजमान केले. १९८९ साली कृषी उत्पन्न बाजार समितीची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली. यात जयवंतरावांच्या नेतृत्वाखाली जगताप गट विजयी झाला. येथूनच जयवंतरावांचे नेतृत्व खऱ्या अर्थाने बहरत गेले.

१९९० साली झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत अपक्ष म्हणून उभे राहत मोठ्या मताधिक्याने विजयी होत जयवंतराव जगताप विधानभेत पोहचले. विधानसभेतील सर्वात तरूण आमदार म्हणून त्यांची नोंद झाली. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार, मंत्री सुशिलकुमार शिंदे, डॉ.पद्मसिंह पाटील, गोविंदराव आदिक, पतंगराव कदम, प्रतापराव भोसले आदींनी त्यांचेतील नेतृत्वगुण ओळखून त्यांना करमाळ्याच्या विकासासाठी सर्वोतोपरी मदत केली. तद्नंतर १९९३ साली आ.जयवंतराव जगताप यांची सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदी निवड झाली. १९९५ साली आ.जयवंतराव जगताप यांचे नेतृत्वाखाली करमाळा नगरपरिषदेत जगताप गटाची सत्ता आली. सन २००१ साली मा.आ.जयवंतराव जगताप यांचे नेतृत्वाखाली श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्यात जगताप गट विजयी झाला.

शिक्षण संस्थेचे चेअरमन झालेनंतर त्यांनी महात्मा गांधी विद्यालयात सर्वप्रथम सायन्स उच्च माध्यमिक विद्यालय वाढवले व तांत्रिक विद्यालय सुरू केले. आज महात्मा गांधी विद्यालय तालुक्यातली एक उत्कृष्ट व आदर्श विद्यालय म्हणून ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. विद्या विकास मंडळाच्या वतीने यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या कामकाजात सुधारणा करीत नामदेवराव जगताप अध्यापक विद्यालयाची स्थापना केली. कालांतराने राजकीय वैचारीक मतभेदातून शिक्षण संस्थांमधील तात्कालीक सहकाऱ्यांनी विश्वासघाताने संस्था बळकावल्या. तरी देखील मा.आ.जयवंतराव जगताप यांनी व्यक्तीद्वेषाचे व मत्सराचे राजकारण केले नाही अथवा आपल्यातील मतभेदामुळे शैक्षणिक संस्थांच्या दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम होवू नये, याची दक्षता घेतली.

जयवंतराव जगताप १९८९ पासून सन २०१८ पर्यंत सलग २९ वर्षे बाजार समितीच्या सभापती पदी कार्यरत होते. आज करमाळा बाजार समितीला एक विश्वसनीय बाजारपेठ म्हणून जो लौकीक प्राप्त झालेला आहे, त्याचे संपूर्ण श्रेय फक्त आणि फक्त जयवंतराव जगताप यांच्या कणखर, विकासाभिमुख नेतृत्वालाच जाते. जयवंतराव जगताप बाजार समितीचे सभापती होणेपूर्वी बाजार समितीचे उत्पन्न अवघे १० ते १५ लाख रूपये होते. जयवंतराव जगताप यांनी शेतकऱ्यांना सुविधा देणेसाठी बाजार समितीचे उत्पन्न वाढ व सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करणेसाठी बाजार समितीमध्ये १५० व्यापारी गाळ्यांची उभारणी केली. यातून बाजार समितीचे भाडे रूपी उत्पन्न वाढून रोजगाराची संधी निर्माण झाली. व्यापारी, शेतकरी, हमाल-तोलार यांचेशी समन्वय राखत कामकाज केल्यामुळे बाजार समितीची सर्वांगीण प्रगती झाली. आज बाजार समितीशी संबंधित सर्वच घटकांशी व्यापारी, शेतकरी, हमाल-तोलार, कर्मचारी यांचेशी जयवंतरावांचे एक भावनिक, अतूट, रक्ताच्या नात्यापेक्षाही श्रेष्ठ असे नाते तयार होवून जयवंतरावांना या घटकांनी देवत्वच बहाल केलेले आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या साठवणूक व आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या साठवणूक व सुरक्षिततेसाठी सेलहॉल व गोदामांची उभारणी केली. शेतकऱ्यांना आर्थिक व्यवहार सुलभतेने करता यावेत, यासाठी मार्केट यार्ड येथे जिल्हा बँकेची शाखा सुरू केली. आज बाजार समितीचे उत्पन्न १ ते १.५ कोटीच्या घरात आहे. जयवंतरावांनी बाजार समितीची सुत्रे हाती घेतल्यानंतर खोंगा-पसा सारख्या अनिष्ठ प्रथा बंद केल्या. शासकीय हमीभाव खरेदी केंद्र सुरू करून मका, तूर, उडीद खरेदीतून शेतकऱ्यांना जवळपास १५ कोटी रूपये मिळवून दिले. जयवंतराव जगताप हे बाजार समितीच्या सर्वांगीण विकासाचे खऱ्या अर्थाने शिल्पकार आहेत. हे सर्व जयवंतरावांच्या नेतृत्वाचे फलित आहे. जयवंतराव जगताप यांच्या बाजार समितीतील प्रदीर्घ अनुभवाची दखल घेऊन सोलापूर- कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांनी जयवंतराव जगताप यांची महाराष्ट्र राज्य बाजार सहकारी संघाच्या संचालक पदी बिनविरोध निवड केली.

१९९३ सालापासून ते २०१८ पर्यंत जयवंतराव जगताप सोलापूर जिल्हा बँकेचे सलग २५ वर्षे संचालक असून बँकेचे उपाध्यक्ष पदही भूषविलेले आहे. बँकेचे कामकाज करताना त्यांनी कधीही गटतट अथवा कर्जास शिफारस ही पध्दत अवलंबली नाही. सर्वच शेतकऱ्यांना बँके मार्फत अर्थसहाय्य केले. मग तो कोणत्याही गटाचा असो अथवा पक्षाचा. बँके मार्फत करोडो रूपयांचे पीककर्ज, पाईपलाईन, ट्रॅक्टर आदीसाठी कर्ज वाटप करून शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान सुधारणेसाठी प्रामाणिक प्रयत्न केले. राज्यात व जिल्ह्यात जिल्हा बँकांमध्ये पदाधिकाऱ्यांकडून कोट्यावधीची बेकायदा कर्जाची प्रकरणे उजेडात येताना फक्त जयवंतराव जगताप यांचेकडेच साध्या टाचणीची देखील रिकव्हरी नसलेले जयवंतराव हे एकमेव संचालक जिल्ह्यात आहेत. जिल्हा बँकेशी संलग्न वि.का.सोसायट्यांचे सचिव हे जयवंतरावांच्या राजकीय वाटचालीत एक विश्वासू सहकाऱ्यांची भुमिका पार पाडत असून जगताप गटाच्या राजकारणाचा ते एक मुख्य कणा आहेत. जिल्हा बँकेचे कर्मचारी व सचिव वृंदामध्ये जयवंतराव जगताप यांना कुटूंब प्रमुखाचे स्थान आहे.

सन २००१ मध्ये श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्यामध्ये जयवंतराव जगताप यांचे नेतृत्वाखाली सत्ता प्रस्थापित झाली. दिलेल्या शब्दाप्रमाणे त्यांनी माजी आमदार रावसाहेब पाटील व गोविंदबापू पाटील यांना अध्यक्ष पदाची संधी दिली. प्रतिकुल परिस्थिती मध्ये जयवंतरावांनी आदिनाथच्या अध्यक्ष पदाची धूरा समर्थपणे पेलत जिल्ह्यात ऊसाला सर्वाधिक दर देण्याची ऐतिहासिक नोंद त्यांचे नावावर आहे. आदिनाथमध्ये सक्षमपणे व्यवस्थापन राबवत, कठोर निर्णय घेत ऊस उत्पादक, वाहनमालक, कामगारांना न्याय दिल्याचे आजही आदिनाथचे सभासद व कामगार अभिमानाने सांगतात.

सन १९९० ते १९९५ व सन २००४ ते २००९ या दहा वर्षांच्या कालावधीत जयवंतराव जगताप यांनी करमाळा विधानसभा मतदार संघाचे विधिमंडळात प्रतिनिधीत्व केले. सन १९९५ साली



सर्वप्रथम जयवंतराव जगताप यांनीच ८५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणणेसाठी दहिगाव उपसासिंचन योजनेस प्रशासकीय मंजुरी मिळवली. सीना-कोळगाव धरणाचे भुमीपूजन व लोकार्पण हे जयवंतरावांच्या कार्यकाळातच झाले. याशिवाय तालुक्यातील रस्ते, वीज, बंधारे, समाजमंदिरे, व्यायामशाळा यासारखी असंख्य संस्मरणीय अशी कामे केली. तालुक्यातील वली बाबा दर्गाह (आवाटी), श्री कमलादेवी मंदिर (श्रीदेवीचामाळ), कोटलिंग मंदिर (चिखलठाण), श्री शनैश्वर मंदिर (पोथरे), आदिनाथ मंदिर (संगोबा) यांना तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देत निधीची उपलब्धता करून दिली. तालुक्यात केम, वडशिवणे, झरे, जातेगाव, वाशिंबे, कुंभारगाव आदी ठिकाणी माध्यमिक विद्यालयांना मंजुरी मिळवली. करमाळा शहराला उजनी धरणावरून पाणीपुरवठा योजना मंजूर करून कार्यान्वीत केली. कुकडी धरणावरून हक्काचे पाणी मांगी तलावात नियमितपणे आणत लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना त्यांचा लाभ मिळवून दिला. करमाळा तालुक्यातील बॅकवॉटर भागात वीजेचा प्रश्न अतिशय गंभीर होता. आ.जयवंतराव जगताप यांनी जेऊर येथे २२० के.व्ही. व ११० के.व्ही. चे सबस्टेशन तत्कालीन ऊर्जा मंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांचेकडून खास बाब म्हणून मंजूर करून आणले व अल्पावधीत उभारून कार्यान्वित केले. याशिवाय पिक विमा, नुकसान भरपाई, विहिरी, शेततळे व लाभार्थ्यांच्या विविध अनुदान योजनांचा कृषी व महसुल प्रशासनामार्फत लाभ मिळवून दिला. याशिवाय शहर व तालुक्यातील अंगणवाड्या सुरू केल्या. तालुक्यातील आरोग्य सेवांचा स्तर उंचावला. तालुक्यातील रूग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी, श्री शिर्डी देवस्थान, श्री सिध्दीविनायक देवस्थानच्या माध्यमातून लाखो रूपयांची आर्थिक मदत मिळवून दिली. याशिवाय असंख्य शासकीय योजना व विधायक कामे आमदारकीच्या माध्यमातून केली. करमाळा नगरपरिषद १९९५ सालापासून जयवंतराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली जगताप गटाच्या सलग २५ वर्ष ताब्यात आहे. क वर्ग नगरपरिषद असताना देखील जयवंतराव जगताप यांनी अपक्ष आमदार असताना खास बाब म्हणून उजनी जलाशयावरून दहिगाव येथून करमाळा शहरासाठी पाणीपुरवठा योजना मंजूर करून ती कार्यान्वीत केली**(पान १९ वर)**



**आदिनाथवर जगताप गटाची सत्ता आल्यानंतर कै.गोविंदबापू पाटील कै.रावसाहेब पाटील यांचे समवेत मा.आ.जयवंतराव जगताप**



**आषाढी वारीतील दिंडीतील महाराजांचे श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना मा.आ.जयवंतराव जगताप**

# एक तत्वनिष्ठ राजकारणी !

२००९ मध्ये शहराची वाढती लोकसंख्या व विस्तार याचा विचार करून १३ कोटीची विस्तारीत पाणीपुरवठा योजना देखील मंजूर करून कार्यान्वीत केली. याचा परिणाम म्हणजे संपूर्ण महाराष्ट्र दुषकाळात होरपळत असताना, लातूरला रेल्वद्वारे पाणीपुरवठा होत असताना, सोलापूर व अक्कलकोट सारख्या ठिकाणी १५-१५ दिव पाणी येत नव्हते. परंतू करमाळा शहरात मात्र अखंडीत, स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा अव्याहतपणे सुरू आहे. त्याचबरोबर शहरातील रस्ते, वीज, आरोग्य, स्वच्छता या बाबी अतिशय सुरळीत असल्यामुळे शहरवासियांची जयवंतरावांच्या नेतृत्वावर अगाढ श्रध्दा व ठाम विश्वास आहे. आगामी काळात शहरात भुयारी गटार योजनेस मंजुरी, नवीन प्रशासकीय इमारत, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणी आदीसाठी निधीची उपलब्धता व लवकरात लवकर ही योजना पूर्णत्वास नेण्याचा जयवंतराव जगताप यांचा मानस आहे.

जगताप गटाला करमाळा तालुक्यात कार्यकर्ते व नेते घडविणारी नर्सरी असे संबोधले जाते. सन १९९० नंतर तालुक्याच्या राजकारणात आलेले बहुसंख्य पदाधिकारी हे जयवंतराव जगताप यांच्या नेतृत्वाखालीच घडलेले आहेत. राजकीय महत्वाकांक्षेपोटी जरी कालांतराने काहींनी गटबदल अथवा गट स्थापना केली असलीतरी या सर्वांचा राजकीय जन्म अथवा श्रीगणेश जयवंतराव जगताप यांच्या करंगुळीला धरूनच झालेला आहे; हे निर्विवाद व कटू सत्य आहे. माजी आमदार नारायण पाटील हे सर्वप्रथम बाजार समिती उपसभापती, जि.प.सदस्य जयवंतरावांच्या नेतृत्वाखालीच झाले. माजी आमदार कै.दिगंबरराव बागल हे जगताप गटातूनच जि.प.सदस्य, पं.स.सभापती, आदिनाथ कारखाना संचालक झाले. शहाजीराजे भोसले, कै.सुभाष सावंत, राजेंद्र बारकुंड हे जयवंतराव जगताप यांच्या नेतृत्वाखालीच जि.प.ला विजयी झाले. राजेंद्र बारकुंड यांना जयवंतराव जगताप यांच्यामुळे जि.प.उपाध्यक्ष पदाची संधी मिळाली. सुभाष गुळवे यांना आदिनाथ साखर कारखान्याचे संचालक व उपाध्यक्ष पदाची संधी जयवंतराव जगताप यांनी दिली. आदिनाथच्या अनुभवाचा फायदा आज त्यांना बारामती ॲग्रो शुगरचे संचालक पदी काम करताना होत आहे. जयवंतराव जगताप यांनी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही. बहुसंख्य समाजासह अल्पसंख्य समाजासही त्यांनी राजकारणात न्याय दिला. करमाळा नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदी त्यांनी युसूफ नालबंद, ॲड.डी.पी.जगताप, सुशिला आगलावे, शौकत नालबंद, सुनिता वार्शिबेकर, विद्या चिवटे, पुष्पा फंड, अमोद संचेती, दिपक ओहोळ, ज्ञानेश्वर मोरे, वैभव जगताप आदींना संधी दिली. तर उपनगराध्यक्ष पदी हनिफ कुरेशी, दादासाहेब सावंत, ॲड.कमलाकर वीर, राजकुमार परदेशी, अहमद कुरेशी, रतनचंद दोशी, सत्यभामा बनसुडे, प्रशांत ढाळे आदींना संधी दिली. आदिनाथ कारखाना, बाजार समिती, खरेदी-विक्री संघ, जिल्हापरिषद, पंचायत समिती नगरपरिषदेच्या माध्यमातून अनेक कार्यकर्त्यांना संधी दिली. माजी जि.प.अध्यक्ष अनिरुध्द कांबळे, पं.स.सभापती गहिणीनाथ ननवरे व अन्य जि.प. व पं.स.सदस्य हे जयवंतराव जगताप यांच्या पाठबळामुळेच विजयी होवू शकले; ही वस्तुस्थिती आहे.

माजी आमदार जयवंतराव जगताप म्हणजे करमाळा तालुक्यातील जनतेच्या हृदयसिंहासनावर खऱ्या अर्थाने आरूढ झालेले व्यक्तीमत्व आहे. जयवंतराव जगताप यांच्यावर जीवापाड प्रेम करणारा एक मोठा निष्ठावंत वर्ग करमाळा तालुक्यात आहे. जयवंतराव जगताप अत्यंत परखडपणे, स्पष्टपणाने आपले मत मांडणारे हजर जबाबी व्यक्तीमत्व आहे. राजकीय कुरघोड्या, कुटील कारस्थाने, सुड भावना ही त्यांच्या रक्तातच नाही. एक अध्यात्मिक व नैतिकतेवर आधारीत वैचारीक बैठक असल्यामुळे जयवंतराव यांनी आपल्या विचारांशी व तत्वांशी कधीही तडजोड केली नाही. भलेही यामुळे त्यांचे राजकीय नुकसान झालेतरी ते



त्याची तमा बाळगत नाहीत. जयवंतराव जगताप यांचा कर्मावर अगाध विश्वास आहे. संत कबीर यांच्या साहित्याचा व वचनांचा जयवंतराव जगताप यांच्यावर फार मोठा प्रभाव आहे. सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात सर्वच पक्षाच्या नेतेमंडळी बरोबर त्यांचे अत्यंत स्नेहाचे संबंध आहेत. बार्शीचे आमदार राजाभाऊ राऊत, माढ्याचे आमदार बबनदादा शिंदे, करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे, सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांच्याशी त्यांचे अत्यंत सलोख्याचे संबंध असून बंधुत्वाचे नाते आहे. त्याचबरोबर आ.सुभाष देशमुख, आ.विजयकुमार देशमुख, आ.राम शिंदे, मा.आ.प्रशांत परिचारक, मा.आ.सिध्दाराम म्हेत्रे, मा.आ.दिलीप माने, विनायकराव पाटील, शहाजी पवार, प्रकाशबापू पाटील, बळीराम साठे, बाळासाहेब शेळके यांच्याशी त्यांचे स्नेहाचे संबंध आहेत. सोलापूरातील दिवंगत नेते माजी आमदार सुधाकरपंत परिचारक, आनंदराव देवकते, कमळे गुरूजी, औदुंबरआण्णा पाटील, ब्रह्मदेवदादा माने, बाबुराव चाकोते, महादेवराव पाटील, सातलिंगअप्पा म्हेत्रे, वि.गु.शिवदारे आण्णा यांचे जयवंतराव जगताप यांचेवर पुत्रवत प्रेम होते. खा.शरद पवार, माजी केंद्रीय मंत्री सुशिलकुमार शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महसुल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खा.रणजितसिंह नाईकनिंबाळकर, माजी मंत्री डॉ.पद्मसिंह पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख (अमरावती), माजी आमदार मारोतराव पवार, बारामती ॲग्रोचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांचेशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत.

अशा या लोकनेत्याला चार वर्षापूर्वी राजकीय द्वेषातून त्यांचे राजकीय जीवनच नव्हे तर जीवनातूनच उठविण्याचे कुटील, षडयंत्री कटकारस्थान विरोधकांनी रचले व जयवंतराव जगताप यांचेवर खोटे गुन्हे दाखल केले. त्यांच्या एकुलत्या एक मुलीच्या लग्नात अडथळे आणण्याचे नीच व अत्यंत हीन पातळीवरील कारस्थान रचले. परंतू आपल्या कर्मावर व नैतिकतेवर गाढा विश्वास असलेले जयवंतराव डगमगले नाहीत. निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या प्रेमाच्या, आशिर्वादाच्या व शुभेच्छांच्या जोरावर जयवंतराव प्रतिकुल परिस्थितीतून बाहेर पडले. कर्मसिध्दांता वर/जैसी करनी वैसी भरणी.. यावर विश्वास असल्यामुळेच प्रतिशोध अथवा बदल्याच्या भावनेतून जयवंतराव जगताप यांनी त्यांच्या दहा वर्षाच्या आमदारकीच्या अथवा आमदार शिंदे यांच्या सत्तेच्या माध्यमातून पोलीस स्टेशन हाताशी धरून खोट्या केसेस करणे, राजकीय षडयंत्रे, कुरघोड्या सारखे प्रकार कधीही केले नाही किंबहूना जयवंतराव जगताप यांच्या रक्तातच नाही

लोकसभा निवडणुकीपूर्वी तांत्रिक अडचणीमुळे जयवंतराव जगताप हे उपस्थित राहू शकले नसलेतरी त्यांच्या मार्गदर्शन व सूचनेनूसार युवा नेते शंभुराजे जगताप यांचे नेतृत्वाखाली जगताप गटाने एप्रिल २०१९ मध्ये भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, आमदार राजेंद्र राऊत, माजी खासदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत करमाळा येथे जाहीर कार्यक्रमात भारतीय जनता पक्षात प्रवेश केला व माढा लोकसभा मतदार संघात भाजपचे उमेदवार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या विजयात खारीचा वाटा उचलला. तीन वर्षापूर्वी विधानसभेच्या निवडणुका झाल्या. सन २०१९ मध्ये विधानसभा निवडणूकीपूर्वी भाजप शिवसेना युतीतून मतदारसंघ शिवसेनेकडे गेल्याने व शिवसेनेने चुकीची उमेदवारी दिल्यामुळे जयवंतराव जगताप यांनी वरीष्ठांच्या कानावर घालून अतिशय विचारपूर्वक, बुध्दी कौशल्याने निर्णय घेत स्वत: विधानसभा न लढविण्याचे जाहीर करून निवडणूक लढविण्यास नकार देणाऱ्या संजयमामांना राजी करून त्यांना अपक्ष लढण्यास तयार केले व त्यांच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. यावेळी माजी आमदार जगताप यांनी संजयमामांना निवडून आलेनंतर भाजपला पाठींबा देण्याची अट घातली होती. आमदार शिंदे यांनी देखील जगताप यांच्या शब्दाचा मान राखत सर्वप्रथम मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांना पाठींब्याचे पत्र दिले. दुर्दैवाने त्यावेळी भाजपचे सरकार आले नाही व मतदार संघाच्या विकासासाठी अपक्ष आमदार शिंदे यांनी महाविकास आघाडी सरकारला पाठींबा दिला. संजयमामांना विजयी करून त्यांनी करमाळा तालुका विकासाच्या मुळ वाटेवर आणण्याचे ठरविले आहे. आमदार संजयमामा शिंदे देखील जयवंतराव जगताप व मतदार संघातील जनतेने टाकलेल्या विश्वासास पात्र राहत लोकप्रतिनिधीचे कार्य अत्यंत कार्यक्षमतेने पार पाडत तालुक्यातील रखडलेल्या योजना व कामे शासन दरबारी प्रयत्न करून मार्गी लावताना दिसत आहेत. अशा या पारखी व तत्वनिष्ठ नेतृत्वास वाढदिवसा च्या हार्दिक शुभेच्छा ! तसेच त्यांना दीर्घायुष्य लाभो, हीच कमलाभवानी व आदिनाथ चरणी प्रार्थना !



✻✻✻ ...दत्तात्रय भागडे सर



माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याशी विकासकामाबाबत चर्चा करताना माजी आमदार जयवंतराव जगताप



केंद्रीय माजी ऊर्जा मंत्री सुशिलकुमार शिंदे यांचे वीजेबाबत निवेदन देताना जयवंतराव जगताप


12 डिसेंबर
करमाळा तालुक्याचे किंगमेकर य माजी आमदार
मा.जयवंतराव जगताप साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त...
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
महात्मा गांधी ज्यु.कॉलेज ऑफ सायन्स, करमाळा.
श्री.पी.ए.कापले (प्राचार्य)
श्री.ए.एच.बागवान (उप–प्राचार्य)
श्री.एस.टी.शिंदे (पर्यवेक्षक)
श्री.बी.के.पाटील (पर्यवेक्षक)
प्रा.व्ही.एल.पवार (विभागप्रमुख)
प्रा.यु.डी.पाटोळे, प्रा.एस.बी.कन्हेरे, प्रा.पी.ई.सागडे, प्रा.एम.पी.झालटे, प्रा.सौ.एस.ए.बुद्रूक, प्रा.डी.बी.भागडे, प्रा.एस.एन.नलवडे,
प्रा.जे.एन.चौरे, प्रा.एम.पी.थोरात, प्रा.पी.जे.जाधव, प्रा.बी.एस.इबितदार, प्रा.एच.ए.निंबाळकर, प्रा.डी.पी.लावंड, प्रा.एस.एस.यादव, प्रा.एस.बी.जाधव
प्रा.के.जी.कुसकर, प्रा.एम.डी.पाटोळे, सौ.एस.बी.घळके, प्रा.डी.के.दळवे, एम.बी.चोरगे (प्रयोगशाळा परिचारक)


माजी आमदार
मा.जयवंतराव जगताप(साहेब) यांना
12 डिसेंबर
वाढदिवसाच्या.. हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
करमाळा तालुका खरेदी-विक्री संघ
चेअरमन, व्हा.चेअरमन, सर्व संचालक मंडळ
व कर्मचारी वृंद, विठ्ठल उमाजी तोरणे (मॅनेजर)
दादासाहेब देविदास पुजारी, शिवाजी रामचंद्र काळे


देशभक्त
किंगमेकर व माजी आमदार
श्री.जयवंतराव जगताप
आपणांस दि.१२ डिसेंबर रोजी असलेल्या
वाढदिवसास लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा !
श्री.धनंजय कोडलिंगे
शुभेच्छुक
समस्त ग्रामस्थ व कोडलिंगे परिवार
पोंधवडी, ता.करमाळा

न्यु प्रविण सुपर मार्केट

- बोल्ड नं.१ बदाम – ६०० रू. किलो
- नं.१ काजू – ७०० रू.किलो
- पिस्ता – २५० रू. पावकिलो
- मनुका – ६० रू. पावकिलो
- खजूर (डेटक्राऊ) – १४० रू अर्धाकिलो
- खजूर – ७० रू. अर्धाकिलो
- केळी वेफर्स – १०० रू. अर्धाकिलो
- जोडगहू – ६० रू. किलो
- पाणीपुरी – २५ रू. पावकिलो
- पॉपकॉर्न मका – ३० रू. पावकिलो
- मोहूरी(बारीक) – ८० रू. किलो
- महावीर पापड – ११० रू. अर्धाकिलो
- नाचणी – ५० रू.किलो
- खोबरं – १८० रू.किलो

स्पेशल कडधान्य...

- नवीन बेस्ट मटकी – ९० रू. किलो
- मटकी स्पे.गावरान – १३० रू. किलो
- काबोली – ७० रू. किलो
- वटाणा हिरवा – ६० रू. किलो
- मुग(बारीक) – ८५ रू.किलो
- चवळी – ७० रू.किलो
- अख्खा मसुर – ९० रू.किलो
- पाणीपुरी वटाणा – ७० रू. किलो
- शाबुदाणा – ६० रू.

गुळभेंडी, सुरती, हूरडा मिळेल.

- नं.१ २१८९ गहू – ३४ रू.किलो
- नं.१ २४९६ गहू – ३५ रू.किलो
- ज्वारी(बेस्ट) – ५० रू.किलो
- नं.१ बाजरी – ३० रू.किलो

संपर्क

ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा

मो.9168052318

# ट्रक्टरची स्कुटीला धडक - मायलेकी जखमी

करमाळा (सं.प्र.): ट्रॅक्टर चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर हयगयीने व भरधाव वेगाने चालवून एका स्कुटीला पाठीमागून जोराची धडक दिल्याने स्कुटीवरील मुलगी व तिची आई गंभीर जखमी झाले आहेत. हा प्रकार झरे–वीट रस्त्यावर घडला आहे. या प्रकरणी गणेश रामदास खराडे (वय–३२) याने करमाळा पोलीसात फिर्याद दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २४ नोव्हेंबर रोजी दुपारी चार वाजता मी बारामती येथे असताना मला माझा मावसभाऊ किशोर कृष्णा रायगुडे याचा फोन आला, की तुझी बहिण लतिका नागनाथ भोसले (वय–३७) व मंगल रामदास खराडे (वय–५५) या स्कुटीने जात असताना त्यांना अपघात झाला आहे. या अपघातात ट्रॅक्टर चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर क्र.एमएच ४५ एफ ९४९९ हा भरधाव वेगाने चालवून स्कुटीला पाठीमागून धडक दिल्याने बहिण लतिका हिच्या पायावरून चाक गेले आहे. तसेच आईला अंगावर ठिकठिकाणी जखमा झाल्या आहेत. त्यामुळे त्यांना प्राथमिक उपचारासाठी करमाळा येथील उपजिल्हा रूग्णालयात पाठविण्यात आले. परंतू डॉक्टरांनी पायातून जास्त रक्तस्त्राव झाल्याने लतिका हिला पुणे येथे पाठविण्यात आले आहे. या प्रकरणी अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरूध्द गुन्हा दाखल झाला असून, पुढील तपास सुरू आहे.

# दिवेगव्हाण येथून १५ वर्षाची युवती बेपत्ता

करमाळा(सं.प्र.) : दिवेगव्हाण (ता.करमाळा) येथून १५ वर्षाची युवती ३० नोव्हेंबर रोजी बेपत्ता झाली आहे. या प्रकरणी मुलीच्या वडीलांनी फिर्याद दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आम्ही ऊसतोड मजूर असून परिवारासह दिवेगव्हाण येथे आलो आहोत. १ डिसेंबर रोजी मध्यरात्री आम्ही राहत असलेल्या कोपीतून आम्ही सर्व झोपेत असताना माझी १५ वर्षाची मुलगी निघून गेली आहे. मला असा संशय येतो, की तिला अमिष दाखवून फुस लावून पळवून नेले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# घराचा कडीकोयंडा व कुलूप तोडून ७० हजाराची चोरी

करमाळा(सं.प्र.) : जातेगाव येथे एका घराचा कडीकोयंडा व कुलूप तोडून घरात प्रवेश करून अज्ञात चोरट्यांनी ६० हजार रूपये किंमतीचे सोन्याचे गंठन व रोख रक्कम १० हजार रूपये असा एकूण ७० हजार रूपयाचा ऐवज चोरून नेला आहे. या प्रकरणी आदेश उर्फ दादासाहेब शिंदे यांनी करमाळा पोलीसात फिर्याद दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ३० नोव्हेंबर रोजी मी व माझा भाऊ सकाळी दहा वाजता शेतात गेलो. शेतातून काम करून घरी आलो व नंतर घराला कुलूप लावून करमाळा येथे कामानिमित्त आलो. त्यानंतर मला माझ्या मुलीचा फोन आला की, आपल्या घरी चोरी झाली आहे. मी तातडीने माझ्या भावाला फोन करून घरी जाण्यास सांगितले, तर त्याने घरी जाऊन पाहिले असता घरातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले व कपाटातील ६० हजार रूपये किंमतीचे दीड तोळ्याचे सोन्याचे गंठन व रोख रक्कम १० हजार रूपये तेथे दिसून आली नाही. यावरूनच कोणीतरी अज्ञात चोरट्याने ही चोरी केल्याचे लक्षात आले. या प्रकरणी करमाळा पोलीसांनी अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# भगतवाडी येथे एकास मारहाण

करमाळा: शेतातील बांधावरून का जातो.. असे म्हणून तिघांकडून एकास खोऱ्याच्या दांड्याने मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली आहे. हा प्रकार २ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास भगतवाडी येथे घडला आहे. या प्रकरणी किशोर कांतीलाल गिरंजे यांनी फिर्याद दिली. यात निलकंठ सदाशिव गिरंजे, सदाशिव हरिश्चंद्र गिरंजे व आण्णा पांडूरंग गिरंजे यांचेवर पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

आनंद ड्रायफ्रुटस्

स्वादीष्ट व चविष्ट उपवासाचे पदार्थ तसेच ड्रायफ्रुटस् मिळण्याचे ठिकाण

होलसेल व रिटेल विक्रेते...

ऑफर मर्यादित कालावधीसाठी

ड्रायफ्रुटस्, नमकीन, उपवास पदार्थ, मुखवास, बेकरी, लोणचे, चटणी मसाले, पापड व आणखीन भरपूर काही मिळेल.

- नं.१ बोल्ड बदाम - ६०० रू.किलो
- काजू - ७०० रू. किलो
- पिस्ता - २४० रू.पावकिलो
- मणुका - ६० रू.पावकिलो
- खजूर(डेटक्राऊन कंपनी) - १३० रू.अर्धाकिलो
- खजूर - ७० रू.अर्धाकिलो

प्रोप्रा : अमोल र. हिरण

मो.९२७०४९६८६७/७०५७२५८३८५

संपर्क : एच.यु.गुगळे कापड दुकान समोर, मेनरोड, करमाळा.

स्थलांतर... स्थलांतर... स्थलांतर...

डॉ.कापडी यांचा भवानीपेठ मधील दातांचा दवाखान्याचे स्थलांतर बी.एम.कॉम्प्लेक्स, गाळा नं.५, सचिन मेडिको समोर, दत्तपेठ, करमाळा येथे झाले आहे.

संपर्क : मो.9850086449





12 Dec

करमाळा तालुक्याचे किंगमेकर व माजी आमदार

मा.जयवंतराव(भाऊ) जगताप साहेब

आपणांस वाढदिवसानिमित्त.. हार्दिक शुभेच्छा !

श्री.रामचंद्र क्षीरसागर

शुभेच्छुक

विठ्ठलप्रसाद इलेक्ट्रीक & मोटार रिवायडींग

प्रोप्रा : रामचंद्र दशरथ क्षीरसागर
हरीभाऊ दशरथ क्षीरसागर

क्षीरसागर परिवार

स्वामी समर्थनगर, फंडगल्ली, करमाळा.



खुशखबर.., लवकरच घेऊन येत आहोत..!

कांचन गोल्ड ड्रॉप

लाकडी घाण्याचे शुध्द करडी, शेंगदाणा, खोबरे व तीळाचे तेल

प्रोप्रा : सौ.कांचन रघुनाथ क्षीरसागर (९२८४६६१०२५)

# शंभुराजे जगताप यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा

करमाळा(सं.प्र.) : जगताप गटाचे युवा नेते शंभुराजे जगताप यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. शंभुराजे जगताप यांचे वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर, विविध क्रिडा स्पर्धा तसेच स्वच्छता अभियान, वृक्षारोपण आदी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. तसेच विविध सामाजिक संघटना, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच मित्र परिवार, जगताप गटाचे कार्यकर्ते यांनी शंभुरजे जगताप यांचा सत्कार करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.









शंभुराजे जगताप यांनी वाढदिवसानिमित्त देशभक्त कै.नामदेवरावजी जगताप यांचे पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.शेजारी युवा नेते धनराज शिंदे









## नीट परीक्षा उत्तीर्ण उदय वाघमारे यांचा गुणगौरव सोहळा

# निरपेक्ष रूग्णसेवा हाच वैद्यकिय शिक्षणाचा प्रमुख उद्देश : नारायण पाटील



करमाळा(सं.प्र.) : निरपेक्ष रूग्णसेवा हाच वैद्यकिय शिक्षण पूर्ण करण्याचा प्रमुख उद्देश असावा; असे मत माजी आमदार नारायण पाटील यांनी व्यक्त केले.

जेऊर येथे नीट या राष्ट्रीय पातळीवरील पात्रता परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवून एम.बी.बी.एस.च्या प्रथम वर्षासाठी प्रवेश प्राप्त केल्याबद्दल उदय पांडूरंग वाघमारे यांचा गुणगौरव सोहळा आयोजित केला होते. त्याप्रसंगी श्री.पाटील बोलत होते. यावेळी माजी आमदार दत्तात्रय सावंत, भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अनिलकुमार गादीया, संचालक विलास पाथ्रुडकर, सचिव प्रा.अर्जुनराव सरक, जिल्हा माध्यमिक शिक्षक पतसंस्थेचे संचालक मोहोळकर, माजी प्राचार्य ह.सि.धालगडे, मरळ सर, प्राचार्य दहिभाते, मुख्याध्यापक व्यवहारे, कांबळे सर, म.गांधी विद्यालयाचे प्राचार्य पोपट कापले, हेडगेवार विद्यालयाचे प्राचार्य सांगडे सर, नूतन विद्यालय केम चे प्राचार्य रणदिवे सर, हिसरे हायस्कुलचे मुख्याध्यापक जगदाळे, माध्यमिक पतसंस्था चेअरमन मनिषा सपकाळ, माजी चेअरमन यशवंत लावंड, किरण किरवे, सालसे येथील न्यु यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सपकाळ, गणित अध्यापक मंडळाचे कार्याध्यक्ष किरण परदेशी, वामनराव बदे विद्यालयाचे प्राचार्य कोठावळे, सहदेव वाघमारे यांचेसह शिक्षण व इतर क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी भारत शिक्षण प्रसारक मंडळ, ग्रामपंचायत जेऊर, माध्यमिक शिक्षक पतसंस्था करमाळा व सोलापूर आर्दीसह अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने उदय वाघमारे यांचा सत्कार करण्यात आला.

उदय वाघमारे याने नीट परीक्षेत यश मिळवल्याने त्यास आता एमबीबीएस या शिक्षणासाठी चिपळूण (जि.रत्नागिरी येथील बी.के.एल वालावलकर कॉलेज येथे प्रवेश मिळाला आहे. त्याचे कौतूक करताना श्री.पाटील म्हणाले, की उदय वाघमारे याचे यश सर्वसामान्य व गरीब कुटूंबातून शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असे ठरणार आहे. वैद्यकिय शिक्षणावर खाजगी शिक्षण संस्थांचे वर्चस्व असल्याने उच्च वैद्यकिय शिक्षण घेण्यासाठी कोट्यावधी रूपये देणगी स्वरूपात मोजावे लागतात. स्पर्धा खूप असल्याने व शासकीय जागांचा कोटा ठराविक असल्याने मेरीट यादीमध्ये येण्यासाठी निरंतर अभ्यास, चिकाटी, जिद्द हे गुण अंगी असावे लागतात. उदय वाघमारे याचे यश उल्लेखनीय असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणारे आहे; असेही श्री.पाटील यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अंगद पठाडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार बाळासाहेब शिंदे यांनी मानले.

# कावळवाडी शाळेवर तात्काळ पूर्णवेळ शिक्षकाची नेमणूक करावी

## रामभाऊ हाके यांचे गटविकास अधिकारी यांना निवेदन

करमाळा(सं.प्र.) : कावळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला शिक्षकच नसल्याने विद्यार्थ्यांची शिक्षणाची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. शाळेवर तात्काळ पूर्णवेळ शिक्षकाची नेमणूक करावी; अशी मागणी मकाई कारखान्याचे संचालक रामभाऊ हाके यांनी गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे. याबाबत हाके म्हणाले, की जिल्हापरिषद प्राथमिक शाळा कावळवाडी येथे पूर्णवेळ शिक्षक कार्यरत होता. पण गेल्या महिन्याभरापासून ते शिक्षक येत नाहीत. याबाबत ते म्हणाले, की त्या शिक्षकाने पैसे देऊन आपल्या गावाकडे बदली करून घेतली आहे. त्यामुळे सध्या शिक्षकाविनाच शाळा चालू असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. सध्या या शाळेवर एक दिवस जिंतीचा तर एक दिवस भिलारवाडीचा शिक्षक शिकवण्यास येत आहे, तो पण एक-दोन दिवसाच्या फरकाने येत आहे. तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कावळवाडी शाळेवर कायमस्वरूपी शिक्षकाची नेमणूक करावी अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल; असाही इशारा रामभाऊ हाके यांनी दिला आहे.

**सा.संदेश वार्षिक वर्गणी १५० रूपये**

# संविधान दिन व जागतिक एडस दिनानिमित्त भव्य रॅली




करमाळा(सं.प्र.) : संविधान दिन व जागतिक एडस दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, विधी सेवा समिती व वकील संघ यांचे संयुक्त विद्यमाने करमाळा शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीचा शुभारंभ न्यायाधीश मिना इखे, न्यायाधीश आर.ए.शिवरात्री, उपप्राचार्य कॅप्ट संभाजी किर्दाक, ॲड.महादेव कांबळे, ॲड.योगेश शिंपी, वकील संघाचे पदाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.एल.टी.राख व कनिष्ठ/वरीष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक यांचे उपस्थित करण्यात आला. या रॅलीद्वारे विद्यार्थ्यांनी घोषणा देऊन शहर दणाणून सोडले. थोर समाजसेवक महात्मा ज्योतिराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जागतिक एडस् दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती केली. सदर रॅलीची सांगता महाविद्यालयाच्या प्रांगणात झाला. यावेळी न्यायाधीश इखे यांनी संविधान दिनाचे महत्व समजावून सांगितले. स्वयंसेवकांचे पथनाट्य पाहून कौतूक केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर ॲड.महादेव कांबळे यांनी संविधान दिनाची सखोल माहिती सांगितली. या रॅलीमध्ये ९ एमएएच बटालियनचे कॅडेट व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

UAIMS

अत्याधुनिक उपचारांसाठी आता
**पुणे, मुंबईला धावाधाव कशाला ?**
**कारण येणार आहेत उष:काल अभिनवचे डॉक्टर तुमच्या भेटीला !**

उष:काल अभिनवच्या डॉक्टरांची
**कोग्रेकर हॉस्पिटल, करमाळा येथे ओपीडी भेट !**

**हृदयरोग तज्ञ**
डॉ.राहूल महाडिक
Consultant Interventional Cardiologist

**सांधे प्रत्यारोपण**
डॉ.समीर शेख
Consultant Orthopedic Surgeon

**हृदय शस्त्रक्रिया**
डॉ.अमोल भोजे
Consultant Cardiothoracic & Vascular Surgeon

डॉ.रविंद्र भरमगुंडे
Consultant Orthopedic Surgeon

● तारीख : 25 डिसेंबर 2022 । ओपीडी वेळ : स.10 ते सायं.4
● पत्ता : कोग्रेकर हॉस्पिटल, भवानी नाका, कमलादेवी रोड, करमाळा.

● कन्सल्टींग फी : 200 रू. ● टीप : नावनोंदणी आवश्यक

संपर्क
डॉ.अविनाश घोलप (9423250075) डॉ.संजय साळुंखे (9850414071)
डॉ.प्रमोद कांबळे (9665264120) डॉ.चंद्रकांत सारंगकर (7588505175)
डॉ.रोहन पाटील (8788658944) डॉ.शिंदे हॉस्पिटल(हाडाचे) (9975631861)
डॉ.सी.डी.वीर (9423334202)


करमाळा तालुक्याचे किंगमेकर
व माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव जगताप
आपणांस वाढदिवसानिमित्त..
12 डिसेंबर
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
के.बी.कन्स्ट्रक्शन, करमाळा


किंगमेकर व माजी आमदार
मा.जयवंतरावजी जगताप(साहेब)
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा ! तसेच २०१४ पासून प्रलंबित असलेल्या रावगाव येथील ३३/११ केव्हीच्या नवीन सबस्टेशनला मंजुरी मिळण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
सरपंच
दादासाहेब जाधव
श्री.भाऊसाहेब बुधवंत सर
12 डिसेंबर
शुभेच्छुक
भगवान बाबा मित्र मंडळ करमाळा तालुका


देशभक्त
मर,नगराध्यक्ष
मा.उपनगराध्यक्ष
युवा नेते
किंगमेकर
करमाळा तालुक्याचे किंगमेकर
माजी आमदार व आमचे नेते
मा.जयवंतराव जगताप(भाऊ)
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
12 डिसेंबर
सदस्य, वि.का.सोसा
सदस्या, वि.का.सोसा
श्री.सिध्देश्वर नवले
सौ.सुनिता नवले मॅडम
(म.गांधी विद्यालय करमाळा)
शुभेच्छुक
पारेवाडी विविध कार्य. सेवा सोसायटी
चेअरमन, सचिव, सर्व सदस्य व ग्रामस्थ